सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि.६ मे २०२६ | वर्ष - ४ थे | अंक २२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







# अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचे तीन तेरा



**वृत्तसंस्था**

**वॉशिंग्टन :** जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था महागाई आणि बेरोजगारीसह प्रत्येक आघाडीवर संघर्ष करत आहे. तरीही, अमेरिकेला सर्वात शक्तिशाली राष्ट्र असल्याचे सिद्ध करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प कर्जाचा भार असूनही आणखी कर्ज घेऊन युद्ध लढत आहेत. एकंदर परिस्थितीवरून अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचे तीन-तेरा झाल्याचे दृष्टीपथास येत आहे.

इराण आणि होर्मुझ सामुद्रधुनीत अडकून पडलेल्या अमेरिकेने अवाढव्य कर्जाचा विक्रम प्रस्थापित केला आहे. गेल्या तीन महिन्यांपासून अमेरिका पश्र्चिम आशियातील युद्धावर दररोज अब्जावधी डॉलर्स खर्च करत आहे, ज्यामधून कदाचित फारसं काही साध्य होऊ शकणार नाही. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांना जगाला सिद्ध करायचं आहे की अमेरिका जगातील सर्वात शक्तिशाली देश आहे आणि त्यांना जे हवे ते करू शकतो. प्रत्येक भाषणात राष्ट्राध्यक्ष ट्रम्प अमेरिकेकडे जगातील सर्वात शक्तिशाली सैन्य कसे आहे, याची बढाई मारतात. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेत कमबॅक करण्यासाठीअमेरिकेला युद्धात ओढलेजाण्यापासून वाचवण्याचे आणि अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे आश्र्वासन दिले होते. मात्र १९४१ नंतर प्रथमच अमेरिकेचे राष्ट्रीय कर्ज जीडीपीच्या १००% पेक्षा जास्त झाले आहे. अशाप्रकारे, सतत वाढणारी वित्तीय तूट आणि उच्च व्याजदर या संकटाला आणखी गंभीर बनवत आहेत.अमेरिकेचे कर्ज आता त्याच्यासंपूर्ण अर्थव्यवस्थेपेक्षा जास्तझाले आहे. यूएस ट्रेझरीच्या आकडेवारीनुसार, गेल्या आठवड्यापर्यंत जनतेकडील सार्वजनिक कर्ज अंदाजे ३१.२७ ट्रिलियनवर पोहोचले होते तर, १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत देशाचे एकूण आर्थिक उत्पादन किंवा जीडीपी ३१.२२ ट्रिलियन असायचा अंदाज आहे.अमेरिकेचा जीडीपी अंदाजे ३१.२१६ ट्रिलियन डॉलर्स आहे, म्हणजे वशलीं-ीं-ऋउझ रेशो १००.२ टक्क्यांवर पोहोचले आहे. जगातील महासत्ता म्हणून मिरवणाऱ्या अमेरिकन अर्थव्यवस्थेची ही परिस्थिती ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची मानली जाते, कारण त्यामुळे सरकारच्या कर्ज घेण्याची क्षमता आणि आर्थिक स्थिरतेवर दबाव वाढतो.अशाप्रकारे, सरकारचे गुंतवणूकदारांवरील कर्ज आता एका वर्षातील देशाच्या एकूण उत्पादनाच्या मूल्यापेक्षा जास्त झाले असून येत्या काही वर्षांत ही तफावत आणखी वाढू शकते. तसेच अमेरिकेचे वशलीं-ीं-ऋउझ रेशो १९४६ मधील १०६ टक्क्यांचा पूर्वीचा विक्रम ओलांडण्याच्या मार्गावर आहे.त्यामुळे असाच ट्रेंड कायम राहिल्यास अमेरिकन अर्थव्यवस्थेवरील कर्जाचा भार २०३६ पर्यंत १२० टक्केपर्यंत आणि २०५६ पर्यंत १७५% वर वाढण्याचा धोका आहे. मात्र, अमेरिकेकडे डॉलरसारखे राखीव चलन असल्याचा फायदा आहे, पण ही सुरक्षितता देखील मर्यादित आहे आणि दीर्घकाळात महागाई, व्याजदर आणि गुंतवणुकीवर परिणाम करू शकते, असा विश्र्लेषक इशारा देतात.अमेरिकेचे सरकार प्रत्येक १ डॉलरवर अंदाजे १.३३ डॉलर खर्च करत असून यावर्षी अर्थसंकल्पीय तूट १.९ ट्रिलियन डॉलर असल्याचा अंदाज आहे. सततची कर कपात, वाढता सरकारी खर्च आणि उच्च व्याजदर यामुळे कर्जाचा बोजा झपाट्याने वाढत आहे, म्हणूनच येत्या काही वर्षांत कर्जाचं प्रमाण आणखी वाढण्याची शक्यता आहे. जसजसे कर्ज वाढतं तसतसे सरकारला आणखी कर्ज घेणं भाग पडते.सध्या अमेरिकन सरकारच्या एकूण खर्चापैकी प्रत्येक ७ डॉलरपैकी १ डॉलर केवळ व्याजावर खर्च होत असून व्याजदरात थोडी जरी वाढ झाली, तरी पुढील १० वर्षांत अब्जावधी डॉलर्सचा अतिरिक्त भार पडण्याचा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

## आश्रम शाळांना श्रेणी वाढ

**मुंबई :** आदिवासी बांधवांच्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तसेच उच्च व तंत्रशिक्षणाचा विस्तार करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये स्वयंसेवी संस्थांच्या २४ आश्रमाशाळांची श्रेणीवाढ करणे, सोलापूर शासकीय तंत्रनिकेतनमध्ये तीन नवीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करणे आणि तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाला हस्तांतरित करण्याचा समावेश आहे. डोंगराळ आणि दुर्गम भागातील आदिवासी मुलांचे शिक्षण अधिक गतीमान व्हावे, यासाठी आदिवासी विकास विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या ५ प्राथमिक आणि १९ माध्यमिक अनुदानित आश्रमाशाळांची श्रेणीवाढ करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

## अपघातात एक ठार

**नाशिक : वडाळा नाका परिसरात भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. पिकअप आणि दुचाकीच्या झालेल्या या भीषण अपघातात एक जण ठार झाला आहे. घटनेची माहिती मिळताच मुंबई नाका पोलीस घटनास्थळी दाखल झाले. प्रकरणी पोलिसांनी पिकअप चालकास ताब्यात घेतले आहे. तर घटनास्थळी बघ्यानी मोठ्या प्रमाणावर गर्दी केल्याने काही वेळ वाहतूक कोंडी झाली होती..**

## चिमुकलीला छेडण्याचा प्रकार

**पुणे : पुण्यातील बिबवेवाडी परिसरात पुन्हा एकदा धक्कादायक घटना समोर आली आहे. नसरापूर येथे अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरण ताजे असतानाच शहरात आणखी एका ९ वर्षांच्या चिमुरडीवर छेडछाड करण्याचा प्रयत्न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. या घटनेमुळे पुण्यातील बाल-सुरक्षेचा प्रश्र्न पुन्हा एकदा गंभीरपणे ऐरणीवर आला आहे.**

## टाटा ट्रस्टमधील सत्तासंघर्षात नवा ट्विस्ट!

### श्रीनिवासन, विजय सिंह यांच्या फेर नियुक्तीला 'ब्रेक'



**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंग यांच्या टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्र्वस्त म्हणून पुनर्नियुक्तीला मेहली मिस्त्री आणि जे. एन. मिस्त्री यांचा विरोध होत असून त्यामुळे यासाठी आवश्यक एकमताने मंजुरी अद्याप मिळू शकलेली नाही.टाटा समूहाची होल्डिंग कंपनी - टाटा सन्स - च्या संचालक मंडळात मोठ्या बदलांची तयारी सुरू आहे. टाटा ट्रस्ट्समधील वाद वाढतच चालला आहे. मेहली मिस्त्री आणि जे.एन. मिस्त्री यांनी आता वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंग यांना टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्ट मध्ये पुन्हा नियुक्त करण्याच्या प्रस्तावाच्या विरोधात मतदान केले आहे.श्रीनिवासन आणि सिंग यांचा सध्याचा कार्यकाळ पुढील रविवारी संपणार असून ट्रस्टच्या नियमांनुसार, कोणत्याही विश्र्वस्ताचा कार्यकाळ वाढवण्यासाठी 'सर्वानुमते संमती' अनिवार्य आहे. अशा परिस्थितीत, दोन विश्र्वस्तांनी विरोधात मतदान केल्यामुळे वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंग यांचे पुन्हा विश्र्वस्त होणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य दिसतआहे.८ मे रोजी टाटा ट्रस्ट्सची एक महत्त्वपूर्ण बैठक नियोजित असताना ही घडामोड समोर आली आहे. या बैठकीत टाटा सन्सच्या संचालक मंडळावरील ट्रस्ट्सच्या प्रतिनिधित्वाचा आढावा घेतील त्यामळे, आता सर्वांचे लक्ष नोएल टाटा या दुसऱ्या लाईफ-टाइम विश्र्वस्तावर असेल ज्यांनी अद्याप या विषयावर आपले मत व्यक्त केलेले नाही. सर्वच विश्र्वस्त या प्रस्तावाला पाठिंबा देणार नाहीत असे संकेत मिळाले असल्यामुळे ढएऊढ मधील पुनर्नियुक्ती प्रक्रिया आधीच अनिश्र्चित होती.त्याचवेळी, हा मतभेद केवळ एका ट्रस्टपुरता मर्यादित नसून टाटा सन्सच्या संचालक मंडळावरील ट्रस्ट प्रतिनिधींच्या संख्येत संभाव्य बदलाचे संकेत देत आहे. भास्कर भट यांना संचालक मंडळात समाविष्ट केले जाण्याची शक्यता असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## लैंगिक अत्याचारातील आरोपींना पॅरोल देऊ नका!

### नसरापूर घटनेच्या पाशर्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधी आणि न्याय विभागाला निर्देश

**तभा वृत्तसेवा**



**मुंबई :** पुण्यातील नसरापूर (भोर) येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अमानुष अत्याचार आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या संतापजनक घटनेच्या पार्श्र्वभूमीवर मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. लैंगिक शोषण करणाऱ्या गुन्हेगारांना पॅरोल देऊ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. कॅबिनेट बैठकीत बोलताना मुख्यमंत्र्यांनी नमूद केले की, लैंगिक गुन्ह्यांमधील ८० ते ९० टक्के आरोपी हे पूर्वीच्याच गुन्ह्यात जामीन किंवा पॅरोलवर सुटलेले असतात आणि त्या काळात ते पुन्हा असेच गंभीर गुन्हे करतात. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी २०१४ ते २०१९ या काळात आपण मुख्यमंत्री असताना अशा गुन्हेगारांना पॅरोल न देण्याचा कायदा केला होता. काही काळ तो अमलातही होता; परंतु नंतर तो न्यायालयाने रद्दबादल केला. आता यावर कोणताही पर्याय नसताना पुन्हा नव्याने कठोर कायदा तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी विधी व न्याय विभागाला दिले आहेत. नसरापूरमधील दुर्दैवी घटनेबाबत मुख्यमंत्र्यांनी स्वतः पीडितेच्या वडिलांशी दोन वेळा संवाद साधला आहे. याविषयी माहिती देताना ते म्हणाले, अशा नराधमाला भरचौकात फाशी दिली जावी, अशी भावना सर्वांचीच असते. मात्र, लोकशाही कायद्याने चालते. त्यामुळे कायद्यात कोणतीही पळवाट न ठेवता या नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा होईल, यादृष्टीने राज्य सरकार प्रयत्नशील आहे. या प्रकरणाचे दोषारोपपत्र (चार्जशीट) वेळेत दाखल करून हा खटला उच्च न्यायालयाच्या माध्यमातून जलदगती न्यायालयात (फास्ट ट्रॅक) चालवला जाईल. तसे लेखी आश्र्वासन पीडितेच्या कुटुंबालाही देण्यात आले आहे.

## राज्यात मेगा शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा

### ३१ मेपर्यंत जाहिराती प्रसिद्ध करण्याचे निर्देश; 'पवित्र' पोर्टलवरून होणार भरती

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** शिक्षक भरतीची प्रतीक्षा करणाऱ्या लाखो उमेदवारांसाठी दिलासादायक बातमी आहे. अनेक महिन्यांपासून रखडलेली शिक्षक भरती प्रक्रिया आता वेगाने पुढे सरकणार असून, शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांना ३१ मे २०२६ पर्यंत त्यांच्याकडील रिक्त पदांच्या जाहिराती 'पवित्र' पोर्टलवर प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे जिल्हा परिषद, नगरपालिका आणि खासगी अनुदानित शाळांमधील हजारो शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याचा मार्ग खुला झाला आहे.

या भरती प्रक्रियेत शासनाने एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यानुसार, केवळ सध्या रिक्त असलेल्या जागाच नव्हे, तर मे २०२६ अखेरपर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य रिक्त पदांचाही यात समावेश केला जाणार आहे. त्यामुळे उपलब्ध पदांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणार असून अधिकाधिक पात्र उमेदवारांना रोजगाराची संधी मिळणार आहे.

भरती प्रक्रियेचे वेळापत्रकही निश्र्चित करण्यात आले असून, १ ते ३१ मे या कालावधीत सर्व शाळा व्यवस्थापनांनी त्यांच्या रिक्त पदांची माहिती पोर्टलवर नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानंतर जून महिन्यात उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार आणि गुणांच्या आधारे शाळांचे पसंतीक्रम (ऑप्शन्स) निवडण्याची संधी मिळणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असल्याने प्रक्रियेतील पारदर्शकता अधिक वाढेल.

गेल्या वर्षी घेण्यात आलेल्या 'शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी'ला (ढ-खढ) राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला होता. या परीक्षेसाठी सुमारे २ लाख २८ हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती, त्यापैकी २ लाख ११ हजार ३०८ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. यातील १ लाख ७० हजार १०८ उमेदवारांनी आपली स्व-प्रमाणपत्र प्रक्रिया पूर्ण केली असून, या पात्र उमेदवारांना भरती प्रक्रियेत प्राधान्य दिले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. भरती प्रक्रियेत वशिलेबाजीला आळा घालण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. 'पवित्र' पोर्टलच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया होणार असल्याने मानवी हस्तक्षेप पूर्णपणे कमी होणार आहे. तसेच, सर्व शाळांना त्यांच्या आरक्षणानुसार बिंदुनामावली (रोस्टर) तपासूनच जाहिरात देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षकांची पदे पूर्णपणे गुणवत्तेनुसार आणि मुलाखतीशिवाय भरली जाणार आहेत. मात्र, खासगी संस्थांना प्रत्येक एका जागेसाठी दहा उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्याची मुभा देण्यात आली आहे.

## दिवाळीपूर्वी मंत्रिमंडळात फेरबदल?

**तभा वृत्तसेवा**



**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आटोपतच राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या हालचालींना सुरुवात झाली आहे. सत्ताधारी महायुतीमधील घटक पक्षांकडून संघटना अधिक मजबूत करण्यासाठी निर्णायक पावले उचलली जात असून, येत्या दिवाळीपूर्वी राज्य मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. या संभाव्य फेरबदलाच्या हालचालींमुळे राजकीय वर्तुळात, विशेषतः विद्यमान मंत्र्यांमध्ये मोठी अस्वस्थता पसरली आहे. गेल्या अडीच वर्षांच्या काळात काही मंत्र्यांची कामगिरी अपेक्षेप्रमाणे नसल्याची चर्चा वरिष्ठ पातळीवर सुरू आहे. याच पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडून सर्व मंत्र्यांच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला जात असून, या अहवालाच्या आधारेच पुढील निर्णय घेतले जाणार असल्याचे समजते. ज्या मंत्र्यांनी आपल्या खात्यात प्रभावी कामगिरी दाखवली नाही किंवा पक्षाच्या विस्तारासाठी विशेष प्रयत्न केले नाहीत, अशा मंत्र्यांना मंत्रिमंडळातून वगळण्याची शक्यता आहे. राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, कामगिरीत कमी पडणाऱ्या मंत्र्यांना मंत्रिमंडळातून वगळले तरी त्यांना पूर्णपणे बाजूला न ठेवता पक्ष संघटनेत नवीन जबाबदाऱ्या दिल्या जाऊ शकतात. तळागाळापर्यंत पक्षाची ताकद वाढवणे आणि कार्यकर्त्यांना सक्रिय ठेवणे हा यामागील उद्देश आहे. त्यामुळे हा बदल काही नेत्यांसाठी धक्का असला, तरी काहींसाठी तो नवी संधी ठरू शकतो. या फेरबदलात नव्या चेहऱ्यांना मोठ्या प्रमाणावर संधी मिळण्याची शक्यता असून, सध्या राज्यमंत्री म्हणून काम करणाऱ्या काही नेत्यांना कॅबिनेट पदावर बढती मिळू शकते. याशिवाय, आपल्या मतदारसंघात आणि जिल्ह्यात प्रभावी कामगिरी करणाऱ्या आमदारांनाही पहिल्यांदाच मंत्रिपद मिळण्याची शक्यता असल्याने इच्छुकांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. काही खात्यांमध्ये कामाचा वेग मंदावल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. विशेषतः पश्र्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही मंत्र्यांच्या कामगिरीबाबत वरिष्ठ पातळीवर नाराजी असल्याचे बोलले जाते. तसेच, वादग्रस्त ठरलेल्या किंवा स्थानिक स्तरावर जनमानसात नाराजी निर्माण करणाऱ्या मंत्र्यांनाही बाहेरचा रस्ता दाखवला जाऊ शकतो.

## 'आरटीई' प्रवेशावर खासगी शाळांचा बहिष्काराचा इशारा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकाराखाली (आरटीई) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव २५ टक्के प्रवेशांच्या शुल्क परताव्यापोटी तब्बल तीन हजार कोटी रुपये राज्य सरकारकडे थकीत असल्याने राज्यातील स्व-वित्तपोषित खासगी शाळांचे आर्थिक गणित विस्कळीत झाले आहे. परताव्याचा प्रश्र्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्याने शाळा व्यवस्थापनांनी आता कठोर भूमिका घेत २०२७-२८ या शैक्षणिक वर्षापासून आरटीई प्रवेश प्रक्रियेत सहभागी न होण्याचा इशारा दिला आहे. काही वर्षांपासून परतावा वेळेवर न मिळाल्यामुळे आरटीई प्रवेश प्रक्रियेपासून दूर राहण्याची शाळांची प्रवृत्ती वाढत आहे. यंदा ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेत ८,७०१ शाळांनी सहभाग नोंदवला, तर मागील वर्षी हा आकडा ८,८६३ इतका होता. आरटीई कायद्यानुसार, खासगी विनाअनुदानित शाळांना २५ टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवाव्या लागतात. या विद्यार्थ्यांच्या शुल्काचा परतावा केंद्र व राज्य सरकारकडून अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात दिला जाणे अपेक्षित आहे. मात्र, २०११-१२पासून राज्यात या योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर परतावे अनियमित, टप्प्याटप्प्याने आणि उशिराने मिळत असल्याने शाळांच्या दैनंदिन कारभारावर परिणाम होत आहे.सात वर्षांपूर्वी प्रतिविद्यार्थी वार्षिक १७,६०० रुपये इतका परतावा निश्र्चित करण्यात आला होता. मात्रा दरही वेळेवर मिळत नसल्याची तक्रार आहे. 'परताव्यासाठी आम्ही सातत्याने शासनपातळीवर पाठपुरावा करत आहोत. दोन आठवड्यांपूर्वी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्यासोबत बैठक झाली. त्यावेळी परतावा देण्याचे आश्र्वासन मिळाले, मात्र प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झालेली नाही,' असे 'प्रायव्हेट अनएडेड स्कूल मॅनेजमेंट असोसिएशन'चे प्रतिनिधी ॲड. अशोक साळवे यांनी सांगितले.

## तेलक्षेत्रावरील इराणच्या हल्ल्याचा पंतप्रधान मोदींकडून तीव्र शब्दांत निषेध

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** इराणकडून संयुक्त अरब अमिराती (यूएई)च्या फुजैराह तेल औद्योगिक क्षेत्रावर झालेल्या हल्ल्यात तीन भारतीय नागरिक जखमी झाले आहेत. या हल्ल्यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्रालय (एमईए) यांनी तीव्र निषेध केला आहे. त्यांनी या हल्ल्यांना अस्वीकार्य ठरवले आहे. हा हल्ला अशा वेळी झाला आहे, जेव्हा अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव आधीपासूनच वाढलेला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, संयुक्त अरब अमिरातीवर झालेल्या हल्ल्यांचा आम्ही तीव्र निषेध करतो, ज्यामध्ये तीन भारतीय नागरिक जखमी झाले आहेत. नागरिक आणि पायाभूत सुविधांना लक्ष्य करणे अस्वीकार्य आहे. भारत संयुक्त अरब अमिरातीसोबत पूर्णपणे एकजुटीने उभा आहे आणि संवाद व कूटनीतीच्या माध्यमातून सर्व प्रश्र्नांचे शांततापूर्ण समाधान करण्यासाठी आपला पाठिंबा पुन्हा व्यक्त करतो.



पंतप्रधानांनी पुढे सांगितले की, होर्मुज सामुद्रधुनीतून सुरक्षित आणि अखंड वाहतूक सुनिश्र्चित करणे हे प्रादेशिक शांतता, स्थैर्य आणि जागतिक ऊर्जा सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. परराष्ट्र मंत्रालयानेही या घटनेचा निषेध करत म्हटले आहे की, अशा प्रकारचे हल्ले आणि नागरिकांना होणारी हानी अस्वीकार्य आहे. मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, अशा प्रकारचे हल्ले त्वरित थांबवले पाहिजेत. भारत पश्र्चिम आशियात शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित होण्यासाठी संवाद आणि कूटनीतीला पाठिंबा देत आहे.भारताने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत होर्मुज सामुद्रधुनीतून व्यापार आणि वाहतूक कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू राहावी, अशीही अपील केली आहे. तसेच सर्व पक्षांनी शांतता राखावी आणि तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही भारताने म्हटले आहे. दरम्यान, यूएईच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, त्यांच्या हवाई संरक्षण प्रणालीने अनेक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन रोखले. मात्र फुजैराह येथे झालेल्या एका ड्रोन हल्ल्यामुळे तेल सुविधेत आग लागली. या घटनेत तेथे काम करणारे तीन भारतीय जखमी झाले.दरम्यान, ब्रिटिश सैन्याने समुद्रात दोन जहाजांना आग लागल्याची माहिती दिली आहे.

इराणने या हल्ल्याची थेट जबाबदारी स्वीकारलेली नाही. मात्र, त्यांचे परराष्ट्र मंत्री सैयद अब्बास अराघची यांनी अमेरिका आणि यूएईने परिस्थिती अधिक बिघडू नये, याची काळजी घ्यावी असे म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### परभणीत भाजपचा विजय जल्लोष; पश्चिम बंगाल, आसाम व पुदुच्चेरीतील यशानंतर फटाक्यांची आतषबाजी आणि मिठाई वाटप

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम बंगाल, आसाम व पुद्दुच्चेरीतील मिळालेल्या यशाच्या पार्श्वभूमीवर सोमवार ४ मे रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने परभणी महानगरात भव्य आनंदोत्सव साजरा करण्यात आला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांची जोरदार आतषबाजी करीत मिठाई वाटप करण्यात आली.

यावेळी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, अ‍ॅड. एन. डी. देशमुख, मोकींद खिल्लारे, डॉ. केदार खटिंग, मोहन कुलकर्णी, भालचंद्र गोरे, कमलकिशोर अग्रवाल, संजय रिझवानी, दत्तात्रय दैठणकर, मंगलताई मुदगलकर, मधुसूदन जोशी, सुरज चोपडे, मनीषा जाधव, हम्मु चाऊस, शेख निहाल, मोहम्मद गौस, अब्दुल हमीद, संदीप कोकडवार आदी मान्यवर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### भाजपच्या जिल्हास्तरीय बैठकीत संघटन बळकटीकरण व आगामी अभियानांवर सखोल चर्चा

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील सावली विश्रामगृह येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय बैठक उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. बैठकीत पक्षाच्या आगामी अभियानांचे नियोजन, संघटन बळकटीकरण तसेच कार्यपद्धती यावर सखोल व व्यापक चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान जिल्हा प्रभारी प्रवीण घुगे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत आगामी कामकाजासाठी स्पष्ट दिशा दिली. संघटन अधिक सक्षम करण्यासाठी नियोजनबद्ध कार्य, संवाद वाढविणे आणि प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय भूमिका घेण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यावेळी भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, भारतीय जनता पार्टीच्या उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, मीना परतानी, मोकिंद खिल्लारे, सुनील देशमुख, मंगल मुदगलकर, मनीषा जाधव, डॉ. केदार खटिंग यांसह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते.

बैठकीत आगामी अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने आणि कटिबद्धतेने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. संघटन अधिक बळकट करून जनतेपर्यंत पक्षाचे विचार प्रभावीपणे पोहोचवण्यावर भर देण्यात आला.

### नसरापूर प्रकरणी आरोपीविरुध्द जलदगती न्यायप्रक्रियेअंतर्गत कठोर कारवाई करा : सेलूतील नागरिकांची मागणी

**सेलू,/प्रतिनिधी :** नसरापूर येथे अल्पवयीन बालिकेवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपीविरुध्द जलदगती न्यायप्रक्रियेअंतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी सेलूतील संतप्त नागरीकांनी केली आहे.

येथील जयसिंग शेळके, अनुप कान्हेकर, मनोज दीक्षित, अथर्व सोन्नेकर, सौरभ देशपांडे, रवि मोगल, चंद्रशेखर मुळावेकर, बंडू देवधर, भागवत बालटकर, अनुपमा देवधर, किरण कुंडीकर, रूपाली ठाकूर, माधवी आकणीकर, आश्विनी जोशी, उर्मिला जोशी, कोमल दिग्रसकर, गीता मुळावेकर, कुंदा मुळावेकर, मंजुषा कुलकर्णी, राजेंद्र जवळेकर, ललित बोबडे, विश्वंभर दीक्षित आदींसह नागरिक सोमवारी उपजिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना एक निवेदन सादर कले. त्याद्वारे, आरोपीविरुद्ध जलदगती न्यायप्रक्रियेअंतर्गत कठोर कारवाई करावी तसेच राज्यात प्रभावी कायदा अंमलात आणून महिलांवरील अत्याचारांना आळा घालावा, अशी मागणी करण्यात आली.

### जनगणनेसंदर्भातील सोशल मिडीयावरील अर्ज बनावट आणि अनाधिकृत : माहिती महासंचालनालयाद्वारे नागरीकांना नोंद घेण्याचे आवाहन




**परभणी,/प्रतिनिधी :** जनगणना २०२७ च्या अनुषंगाने सध्या सोशल मीडियावर एक अर्ज मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. तो बनावट आणि अनधिकृत आहे, अशी माहिती माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दिली.

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यांतर्गत, नागरिकांनी खालील दोन अधिकृत माध्यमांतूनच ३३ अधिसूचित प्रश्नांची माहिती देणे आवश्यक आहे.१. स्व नोंदणी - नागरिक या संकेतस्थळावर माहिती भरू शकतात. फॉर्म सबमिट केल्यानंतर मिळालेला ' ' त्यानंतर येणाऱ्या प्रगणक भेटीदरम्यान पडताळला जाईल. २. थेट माहिती देणे - दि. १६.०५.२६ ते १४.०६.२६ या कालावधीत आपल्या घरी येणाऱ्या अधिकृत प्रगणकांकडे प्रत्यक्ष माहिती देऊन नोंदणी करता येईल. सोशल मीडिया किंवा इतर प्लॅटफॉर्मवर फिरणाऱ्या कोणत्याही अनधिकृत अर्जांद्वारे, लिंकद्वारे किंवा अनोळखी व्यक्तींना आपली वैयक्तिक माहिती देऊ नका, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने केले आहे.

### ब्राह्मण महासंघाच्या अध्यक्षपदी शाम झाडगावकर : मानवत येथे महासंघाची नूतन कार्यकारिणी जाहीर

**मानवत,/प्रतिनिधी:** येथील ब्राह्मण समाजाची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी शामभाऊ झाडगावकर यांची निवड करण्यात आली आहे.

नूतन कार्यकारणीत विविध पदांवर नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. समाजाच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि विविध उपक्रम राबविण्यासाठी ही कार्यकारिणी कार्यरत राहणार असल्याचे सांगण्यात आले. नूतन कार्यकारिणीत अध्यक्षपदी झाडगांवकर, उपाध्यक्षपदी स्वप्नील गुंडू, कार्याध्यक्षपदी संजय जोशी भोगावकर, सचिवपदी अजय कोकिळ यांची निवड झाली आहे. सहसचिव म्हणून राहुल दलाल, तर कोषाध्यक्षपदी अ‍ॅड. लक्ष्मीकांत कुलकर्णी आणि सहकोषाध्यक्षपदी दुर्गादास उन्हाळे यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून मुकेश दलाल, नारायण जोशी, सुमित दलाल, सीताराम पांडे आणि रघुनंदन कुलकर्णी यांचा समावेश आहे.

तसेच मार्गदर्शक मंडळात अ‍ॅड. अनिरुद्ध पांडे, चंद्रगुप्त भंडारी, विशाल दलाल, राजेंद्र पोतदार, गोविंद जोशी, रंगनाथ कुलकर्णी, सखाराम जोशी, बाळासाहेब कुलकर्णी आणि प्रसाद जोशी यांचा समावेश करण्यात आला आहे. नवीन कार्यकारिणीमार्फत समाजहिताचे विविध उपक्रम, शैक्षणिक व सामाजिक कार्य अधिक प्रभावीपणे राबविले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे प्रशासकीय इमारत बेवारस : संपूर्ण परिसरात प्रचंड गैरप्रकार

## दररोज छोट्या-मोठ्या चोऱ्या, बेसुमार अतिक्रमणे : अधिकारी-कर्मचारी हतबल, दारुचे साम्राज्य

**परभणी ,/प्रतिनिधी:-** येथील प्रशासकीय इमारत जिल्हा महसूल प्रशासनाने सातत्याने सुरु केलेल्या अक्षम्य दुर्लक्षपणामुळे अक्षरशः बेवारस बनली आहे. या इमारतीसह परिसरात दररोज मोठ्या प्रमाणावर खूलेआमपणे दिवसाढवळ्यासुध्दा गैरप्रकार सुरु आहेत. तसेच छोट्या-मोठ्या चोऱ्या नित्याच्या झाल्या आहेत. यामुळे या इमारती अंतर्गत शाासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी अक्षरशः हतबल झाले आहेत.

येथील प्रशासकीय इमारत गेल्या कित्येक वर्षांपासून दुर्लक्षित आहे. अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली या इमारतीत अनेक शासकीय-निमशासकीय कार्यालये व न्यायालयसुध्दा तात्पुरत्या स्वरुपात कार्यान्वित असतांनासुध्दा या इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसह संरक्षणाकडे जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी हे दोन वरिष्ठ अधिकारी ढुंकूनही पाहत नाहीत, हे विदारक चित्र आहे. त्याचा परिणाम या इमारतीच्या परिसरात बेसुमार अतिक्रमणे झाली आहेत. चहाच्या टपऱ्या, पान टपऱ्या, हॉटेल्स, झेरॉक्स सेंटर्स तसेच अन्य विक्रेत्यांनी अतिक्रमणे करीत पक्की बांधकामे सुध्दा केली आहेत. या अतिक्रमणकर्त्यांच्या विरोधात महसूल प्रशासनाने कधीही काडीचीही कारवाई केली नाही. त्याचा परिणाम संपूर्ण इमारतीस या अतिक्रमणकर्त्यांनी अक्षरशः घेरले आहे.

अतिक्रमणकर्त्यांच्या दररोजच्या त्रासापाठोपाठ या इमारतीसह परिसरात दररोज रात्री तळीरामांचा मोठा धूमाकुळ आहे. तरुणाईचे लोंढेच्या लोंढे दारुच्या बॉटल्स घेऊन सायंकाळी ६ वाजल्यापासून रात्री उशीरापर्यंत या इमारतीत, परिसरात ठाण मांडून पार्ट्या झोडू लागले आहेत. इमारत परिसरात, इमारतीतसुध्दा बाटल्यांचा ढिगार साचला आहे. गुटख्याच्या पुड्या, इमारतीवर ठिकठिकाणी गुटख्याच्या



पिचकाऱ्या तसेच काना कोपऱ्यामध्ये लघुशंका, दुर्गंधी असे भिषण चित्र सर्वदूर आहे.

मध्यंतरी या इमारतीच्या देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली तथाकथित कंत्राटदारांनी संरक्षण भिंतीसह इमारतीचे काम केले. ते कामसुध्दा अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. त्यामुळे इमारतीच्या दरवाजांसह खिडक्या, भिंतीचे प्लास्टर अक्षरशः तकलादू झाले आहे. इमारतीच्या छताचे प्लास्टर कधी कोसळेल याची शाश्वती नाही. त्यातच या इमारती अंतर्गत अस्वच्छतेचा प्रकार अक्षरशः किळसवाना आहे. काना कोपऱ्यासह भिंतींवर मोठ्या प्रमाणावर धूळ व जाळे पसरले आहे. संपूर्ण परिसरातसुध्दा मोठ्या प्रमाणावर गवत, केरकचरा, तसेच डागडुजीच्या कामाचा पसारा पडलेला आहे. या इमारतीत स्वछतेबाबत अक्षरशः बोंबाबोंब आहे.

इमारतीच्या परिसरात पार्कींगचे तर तीन-तेरा वाजले आहेत. मूळात पार्कींगला अतिक्रमणांमुळे जागाच शिल्लक नाही. वाहनधारक थेट इमारतीच्या प्रवेशद्वारावर तर काही महाभाग थेट इमारतीतसुध्दा वाहने उभी करीत आहेत. या इमारतीवर कोणाचेही नियंत्रण नसल्याने इमारत बेवारस अवस्थेत उभी आहे.

प्रशासकीय इमारती अंतर्गत शासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी या अनागोदीने अक्षरशः हतबल झाले आहेत. तळीरामाच्या उच्छादासह भूरट्या चोऱ्यांमुळेही सर्व कार्यालये त्रस्तावले आहेत. खिडकीतून, दरवाजाची तोडफोड करीत वस्तू पळविणे नित्याचीच बाब आहे. येथील जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयातील वीज प्रवाहच अज्ञात चोरट्यांनी रविवारी रात्री वायरची चोरी करीत खंडीत केला. गेल्या चोवीस तासांपासून येथील कर्मचारी विजेवीना अक्षरशः बेचैन होऊन अंधारात काम करत बसले होते. याच पध्दतीने अन्य कार्यालयांचेसुध्दा एक एक अनुभव, किस्से अक्षरशः विदारक आहेत. परंतु, साखर झोपेतील जिल्हाधिकाऱ्यांसह अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना या इमारतीच्या परिसरात फेर फटका मारावयास, अतिक्रमण हटविण्यास किंवा अन्य सुधारणा करावयास वेळ नाही, हे दुर्दे आहे.

### संत भगवानबाबा उच्च माध्यमिक आश्रमशाळा १२ वी वर्गाचा निकाल ९७.४७ टक्के

**ईटोली,/प्रतिनिधी-** येथील संत भगवानबाबा उच्च माध्यमिक आश्रमशाळेचा फेब्रु/मार्च २०२६ च्या बारावी बोर्ड परीक्षेतील विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ९३.४७ टक्के लागला असून महाविद्यालयाचा एकूण निकाल ९७.४७ टक्के एवढा लागला आहे. विज्ञान शाखेत ७३ पैकी ७३ आणि कला शाखेत ४६ पैकी ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झालेआहेत. विज्ञान शाखा गुणानुक्रमे प्रथम - कु गायत्री जटाळे, व्दितीय - अनिकेत हागे, तृतीय - अजय नागरे तर कला शाखा प्रथम - अरूण कळसकर, द्वितीय - कु वैष्णवी राऊत,तृतीय - कु विद्या बिरगड यांनी यश संपादन केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे सहाय्यक संचालक श्री रामेश्वरजी मुंडे साहेब, समाज कल्याण अधिकारी श्रीयुत शेख साहेब, लेखाधिकारी डॉ काकडे साहेब, संस्थेचे सचिव केशव घुगे, संचालक श्री विठ्ठल घुगे, प्राचार्य श्री रमेश दराडे, निरिक्षक श्री तुकारामजी भराड साहेब तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आहे.

### के.के.एम. कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**मानवत,/प्रतिनिधी:** येथील के. के. एम. कनिष्ठ महाविद्यालयात बारावीतील (कला, वाणिज्य व विज्ञान) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उत्साहात पार पडला. एच.एस.सी. परीक्षेत महाविद्यालयाने उत्कृष्ट निकाल देत यशाची परंपरा कायम राखली. विज्ञान शाखा ९२.२६%, वाणिज्य ८९.४२% तर कला शाखा ८१.२९% निकाल लागला.



कला शाखेत कु. श्रद्धा राऊत प्रथम, कु. अंजली चव्हाण द्वितीय व कु. वैष्णवी धोपटे तृतीय आल्या. वाणिज्य शाखेत कु. वैष्णवी टेकाळे प्रथम, कु. मयुरी काळे द्वितीय तर कु. वैष्णवी काळे व मयंक तळेकर तृतीय ठरले. विज्ञान शाखेत कु. निकिता वाघमारे प्रथम, कु. भक्ती गोलाईत द्वितीय व कु. किरण गवळी तृतीय आल्या. कार्यक्रमास अध्यक्ष श्री. विजयकुमार कत्रुवार, सहसचिव विजयकुमार दलाल व संचालक दिलीपराव हिबारे पर्यवेक्षक प्रा.अनिल कापसे उपस्थित होते.

त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रा. विनोद हिबारे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. बालासाहेब भिसे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### जोगवाड्यात रात्री भीषण आग; आदिवासी शेतकऱ्याचा संसार राख,लाखोंचे नुकसान

**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील जोगवाडा येथील गट क्रमांक ५६ मध्ये राहणारे आदिवासी शेतकरी मारोती देवबा वाळके यांच्या शेतातील घराला काल दिनांक २ मे रोजी रात्री भीषण आग लागून संसारोपयोगी साहित्य, धान्यसाठा,रोख रक्कम व महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली. या दुर्दैवी घटनेमुळे वाळके कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा अचानक घरातून धूर व आगीच्या ज्वाळा बाहेर येताना दिसताच परिसरातील नागरिक आणि शेजारील शेतकरी मदतीसाठी धावून आले. ग्रामस्थांनी पाण्याच्या सहाय्याने आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले,मात्र आग वेगाने पसरल्याने घरातील सर्व साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

या आगीत गहू, ज्वारी, हरभरा, करडी, तूर, उडीद, सोयाबीन यांसह मोठ्या प्रमाणातील धान्य जळून नष्ट झाले. तसेच फर्निचर, कपडे, भांडी, घरगुती साहित्य, शैक्षणिक कागदपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि इतर महत्त्वाची कागदपत्रेही पूर्णतः जळून खाक झाली. घरात ठेवलेली रोख रक्कमही आगीत नष्ट झाल्याने कुटुंबीयांसमोर



उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे.घटनेची माहिती मिळताच शेजारील शेतकरी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मोठ्या प्रयत्नांनी आग आटोक्यात आणली. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असली, तरी आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सुदैवाने या भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र संपूर्ण संसार उदध्वस्त झाल्याने वाळके कुटुंबीयांचा आक्रोश पाहून ग्रामस्थही हळहळले. घटनेची माहिती मिळताच चारठाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दळवे यांनी घटनास्थळी भेट दिली.

तलाठी वाकळे यांनी पंचनामा केला. यावेळी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, पीडित आदिवासी शेतकरी कुटुंबाला शासनाकडून तातडीने आर्थिक मदत, धान्य व निवाऱ्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### जिंतूर ते औंढा रोडवर लिंबाळा पाटीवर अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर ते औंढा रोडवर लिंबाळा पाठीच्या पुला जवळ अज्ञात वाहनाच्या धडक दिल्यामुळे अशोक सिताराम मांडे वय ४४राहणार ऊखळी तालुका औंढा नागनाथ जिल्हा हिंगोली येथील रहिवासी आसुन शनिवारी दिवसभर आपल्या मिरचीचा व्यापार करून रात्री उशिरा दहा-साडेदहाच्या दरम्यान आपल्या उखळी गावाकडे जात असताना जिंतूर पासून पंधरा किलोमीटर अंतरावर लिंबाळा पाटी च्या पुलात जवळअज्ञात वाहनाच्या धडक दिल्यामुळे दुचाकी वर असलेला युवक अशोक मांडे हा तरुण अज्ञात वाहनाच्या धडकेने मृत्यू पावला या घटनेची जिंतूर पोलीस महामार्ग कॉन्स्टेबल वाल्मीक चव्हाण यांना माहिती मिळतात त्यांनी रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळाकडे धाव घेतली व त्या युवकास जिंतूर ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले रुग्णवायची चे ड्रायव्हर विजय आडे व वाल्मीक चव्हाण या दोघांनी या युवकास जिंतूर ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले व तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले या घटनेची माहिती मिळताच मांडे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे या घटनेमुळे उखळी गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असून सदर घटना शनिवारी रात्री अकराचे दरम्यान घडली असून त्या घटना घडली त्यावेळेस त्यायुवकाजवळ एक बॅग होती त्या बॅगमध्ये दिवसभर व्यापार केलेलेमिरचीचे व्यापार केलेले अंदाजे ७० हजार रुपये होते ते पैसे पोलीस कर्मचाऱ्यांच्या स्वाधीन रुग्णवाहिकेचे ड्रायव्हर विजय आडे यांनी केले आहे या घटनेची जिंतूर पोलिसांना माहिती मिळाली.

## सोयीसुविधा युक्त विद्यालयाची उभारणी करणार- श्री सोमेश्वरानंद सरस्वती

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ ,/प्रतिनिधी:** श्रीक्षेत्र डिघोळ येथे श्रीराम शक्तिपीठ संस्थानाच्या चैतन्य हनुमान मंदिराचे भुमीपुजन सोहळ्यात पीठाधीश्वर श्री सोमेश्वरानंद सरस्वती यांनी डिघोळ परीसरात सर्व सोयीसुविधा युक्त विद्यालयाची स्थापना करण्याचा संकल्प बोलुन दाखवला आहे. शुक्रवार रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

त्र्यंबकेश्वर येथील श्रीराम शक्तिपीठ संस्थान पीठाधीश्वर राष्ट्रसंत अनंत विभूषित श्री श्री १००८ महामण्डलेश्वर स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज (पंचायती अखाडा श्री निरंजनी) यांच्या प्रमुख उपस्थितीत व आशिर्वादाने शुक्रवार दिनांक १ मे रोजी डिघोळ येथे चैतन्य हनुमान मंदिर भूमिपूजन व श्रीराम शक्तिपीठ संस्थानाची स्थापना मोठया उत्साहात पार पडली. याप्रसंगी राष्ट्रसंत अनंत विभूषित श्री श्री १००८ महामण्डलेश्वर स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज यांनी मानवतेचा संदेश देवुन भविष्यात श्रीराम शक्तिपीठ संस्थानाकडून शाळा व भावी तरुणपिढी चांगल्या मार्गावर वाटचाल करावी, व्यसनापासून दुर व्हावी, तरूणांनी शिक्षण घ्यावे, जातिवाद,भेदाभेद,भेदभाव करू नका? हा संदेश ग्रामस्थांना दिला.

यावेळी त्यांनी डिघोळ परीसरात सर्व सोयीसुविधा युक्त विद्यालयाची स्थापना करण्याचा संकल्प बोलुन दाखवला. या सोहळ्या प्रसंगी भाजपा अध्यात्मिक समन्वय आघाडीचे नाशीक जिल्हाध्यक्ष महन्त सिद्धेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज,महन्त श्रीनाथानन्द सरस्वतीजी महाराज (श्रीराम शक्तिपीठ संस्थान), महन्त सुदर्शनानन्द सरस्वतीजी महाराज,महन्त रामानन्द सरस्वतीजी



महाराज, महन्त विश्वेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज,महन्त शिवानन्द सरस्वतीजी महाराज, महन्त हंसानन्द सरस्वतीजी महाराज,डिघोळचे उपसंरपच अजयकुमार देशमुख, सुधीर बिंदू कृष्णा पिंगळे, त्र्यंबकेश्वर येथील बापू पेंडोळे गुरूजी, प्रविण देशमुख गुरूजी, वैजनाथ शिंदे, मारोतराव रंजवे यांच्यासह नाशिक येथील श्रीराम शक्तिपीठ संस्थानाचे साधक मोठया संख्येने उपस्थित होते.तसेच मोठया संख्येने ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

## अग्रलेख...

# परिवर्तन-पर्वाचा उत्तररंग!

युद्धात आणि राजकारणात एकच गोष्ट सत्य असते- 'जो जीता, वही सिकंदर'! केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम या राज्यांच्या व पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकांचे जे निकाल समोर येत आहेत, ते पाहता आता देशभरातील भाजपाविरोधी पक्ष आणि मोदीविरोधकांच्या टोळ्या छाती पिटून पराजयाचे जुने-नवे प्रभावशून्य सिद्धान्त मांडण्यासाठी धडपडू लागतील. आता निवडणुका पार पडलेल्या राज्यांतील किंवा देशाच्या कोणत्याही कोपऱ्यातील कोणाचाही त्यावर विश्वास बसणार नाही. कारण भाजपाला मिळालेल्या यशाचे सारे श्रेय त्या मतदारांचेच असेल आणि विरोधकांची बोथट विश्लेषणे हा त्या मतदारांवरच थेट अविश्वास ठरेल. म्हणूनच, भाजपाच्या नव्या विजयाची नोंद ऐतिहासिक आणि अभूतपूर्व अशा केवळ दोन विशेषणांनीच करता येईल. पश्चिम बंगालसारख्या राज्यात, जेथे भाजपाला चंचुप्रवेशासाठीदेखील खडतर परिश्रम घ्यावे लागत होते, तेथे काँग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि ममता बॅनर्जी यांची तृणमूल काँग्रेस यांना जबर धक्का देत भाजपाने नेत्रदीपक विजय संपादन केला आहे. या एकाच कारणासाठी या निवडणुकांमधील भाजपाचा विजय हा अभूतपूर्व आणि ऐतिहासिक ठरतो. स्वातंत्र्य मिळाल्यापासून, म्हणजे १९४७ ते १९७७ अशा सलग ३० वर्षांची काँग्रेसची राजवट संपुष्टात आणून डाव्या आघाडीने पश्चिम बंगालवर मिळविलेली सत्ता तृणमूल काँग्रेसने ३४ वर्षांनंतर हस्तगत केली. जवळपास १५ वर्षांच्या सत्ताकाळात ममता बॅनर्जी यांनी या राज्यास अक्षरशः वेठीस धरले. ममता बॅनर्जी यांनी केलेली राज्याची दुर्दशाच अखेरीस त्यांची सत्तेवरून हकालपट्टी करण्यास कारणीभूत ठरली. या पराभवाचे खरे विश्लेषण करावयाचे झाले, तर या राज्यातील मतदारांनी ममता दीदी व त्यांच्या पक्षाला दंडित केले, असेच म्हणावे लागेल. देशात गेल्या १२ वर्षांपासून सुरू झालेल्या परिवर्तन पर्वाचा हा एक तेजस्वी उत्तररंग आहे. त्यामुळे पश्चिम बंगालमधील मतदार अभिनंदनास पात्र ठरतात. प्रचंड संख्येने मतदानात सहभागी होऊन लोकशाहीच्या या उत्सवाचे पावित्र्य जपणाऱ्या मतदारांचा कौल त्यांच्या उत्साहातूनच उमटू लागला होता. त्यातून तृणमूल काँग्रेसमधील भयगंडाची लाट भाजपाच्या विजयाचे स्पष्ट संकेत देत होती. निकालानंतर भाजपा विजयाच्या उत्सवावर आरोपांची आणि नव्या-जुन्या कारणांची चिखलफेक करून विरोधकांनी कितीही आक्रस्ताळेपणा केला, तरी भाजपाचा पश्चिम बंगालमधील ऐतिहासिक दिग्विजय हा मतदारांच्या समंजसपणाचाच निःसंशय पुरावा आहे.

केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि आसाम ही चार राज्ये आणि पुडुचेरी या केंद्रशासित प्रदेशातील मतमोजणीतील सध्याचे कल हा भारतीय राजकारणातील बदलत्या प्रवाहांचा आरसा आहे. या निकालांकडे वेगवेगळ्या राज्यांच्या चौकटीत पाहणे जितके आवश्यक आहे, तितकेच त्यांना एकत्रित समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. या चार राज्यांनी दिलेला संदेश बहुपदरी व गुंतागुंतीचा आहे. म्हणूनच तो अधिक बोलका आहे. केरळमध्ये पुन्हा एकदा सत्तांतराचा कल स्पष्टपणे जाणवतो. संयुक्त लोकशाही आघाडी आणि डावी लोकशाही आघाडी यांच्यातील ही पारंपरिक लढत आणि त्यातून दिले गेलेले सत्तांतराचे संकेत हे मतदारांच्या मानसिकतेचे प्रतिबिंब आहे. सत्तेची सूत्रे कायम कोणाही एकाच हाती ठेवायची नाहीत, हा पायंडा केरळच्या मतदारांनी या निवडणुकीतही तंतोतंत पाळला. तामिळनाडूमधील कित्येक दशकांपासून दिसणारा द्रविडीयन राजकारणाचा प्रभाव आणि त्यामधून पोसले गेलेले द्विपक्षीय राजकारण यावेळी ढवळून निघाले आहे. अभिनेता विजय थलपतीचा तमिझगा वेत्री कझगम हा पक्ष या निवडणुकीत समर्थ राजकीय पर्याय म्हणून उभा राहिला आणि प्रस्थापित पक्षांना आव्हान देत त्याने बाजीदेखील मारली. या राज्यातील सत्तांतराचा हा प्रयोग नव्या पक्षाचा उदय तर आहेच. शिवाय, तो पर्यायाच्या शोधात असलेल्या मतदारांच्या मानसिकतेचा आणि इच्छाशक्तीचा पुरावा आहे. राज्यातील नवमतदार, शहरी वर्गाची सजगता आणि परिवारवादी पारंपरिक राजकारणाच्या विरोधात उमटू लागलेली उद्विग्नता यांचा हा परिणाम असावा. आसाममध्ये मात्र स्थैर्याचा वेगळाच सूर ऐकू येतो. येथे भारतीय जनता पार्टीची ताकद निर्विवादपणे वाढत असून हा पक्ष तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करणार आहे. विकास, पायाभूत सुविधांची उभारणी आणि जनतेशी जोडलेले नाते या तीनही घटकांचा हा प्रभाव आहे. पश्चिम बंगाल, केरळ आणि तामिळनाडूत बदलाची लाट असली, तरी आसामच्या जनतेने मात्र सातत्याला कौल देऊन विकासास प्राधान्य दिलेले दिसते. या चार राज्यांचे एकत्रित चित्र पाहिले, तर प्रादेशिक पक्षांची मक्तेदारी संपुष्टात आणून राज्यांना केंद्रातील सत्तेशी जोडत विकासाचे भागीदार बनविण्याची मोदी सरकारची रणनीती मतदारांनी मोठ्या प्रमाणात स्वीकारल्याचे स्पष्ट दिसते. देशाच्या सामाजिक मानसिकतेमध्ये होणारा बदल या निवडणुकांनी ठळकपणे अधोरेखित केला आहे. मतदार अधिक सजग, अधिक प्रयोगशील झाला असून विकास, नेतृत्व आणि राष्ट्रीय अस्मिता या तिन्ही घटकांचा संतुलित विचार करून तो आपला कौल देत आहे, हेदेखील या निकालांतून स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत सर्वाधिक चर्चेचा आणि औत्सुक्याचा मुद्दा पश्चिम बंगालच्या निकालांभोवती केंद्रित झाला होता. या राज्याच्या राजकारणाचा प्रवास काँग्रेसच्या वर्चस्वापासून सुरू झाला. पुढे तो मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या दीर्घकालीन डाव्या सत्तेकडे झुकला आणि नंतर तृणमूल काँग्रेसच्या टप्प्यावर सुमारे १५ वर्षे स्थिरावला. भाजपाच्या विजयामुळे येथील राजकारण राष्ट्रीय दृष्टीने परिपक्वतेकडे जात असल्याचे दिसते. पश्चिम बंगालमध्ये स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या तीन दशकांत काँग्रेसने राज्य केले. १९६० च्या दशकानंतर राजकीय अस्थिरता, नक्षलवादी चळवळ आणि प्रशासनातील ढासळलेली पकड यामुळे काँग्रेसचा प्रभाव कमी होत गेला. औद्योगिक घसरणीची बीजे याच काळात पेरली गेली आणि पुढील अनेक दशके ती राज्याची समस्या बनली. १९७७ मध्ये सत्तेवर आलेल्या डाव्या आघाडीने पश्चिम बंगालच्या राजकारणाला नवा चेहरा दिला. मात्र, ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या हट्टापायी शेती क्षेत्रावर केंद्रित केलेल्या धोरणांमुळे उद्योगधंद्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले. औद्योगिक विकास खुंटला. रोजगाराच्या संधी कमी झाल्याने तरुणाईत असंतोष वाढला आणि डाव्या सत्तेविरुद्ध तयार झालेल्या जनमताचा फायदा घेऊन परिवर्तनाचा नारा देत २०११ मध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला सत्तांतर घडविणे शक्य झाले. ममता बॅनर्जी यांची धोरणे मोठ्या उद्योगांना आकृष्ट करण्यात अपयशी ठरलीच. शिवाय, भ्रष्टाचार आणि राजकीय हिंसाचाराच्या आरोपांची मोठी काजळी ममता सरकारच्या कारकीर्दीवर उमटली. संतुलित विकासासाठी पश्चिम बंगाल भुकेला आहे, ही बाब नेमकी ओळखून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने पश्चिम बंगालच्या विकासाची हमी दिल्याने मतदारांनी भाजपाला भरभरून कौल दिला आहे. विजयानंतरच्या आनंदोत्सवात सहभागी झालेल्या मतदारांनी त्याच अपेक्षांचा पुनरुच्चार केल्याने भाजपाला पश्चिम बंगालच्या विकासाचे स्वप्न साकारण्याचे आव्हान पेलावे लागेल. सत्ता बदलण्याचे काम मतदारांनी करून दाखविले आहे. विकासाचा स्थिर आणि सर्वसमावेशक मार्ग शोधण्याची जबाबदारी आता भाजपाची आहे. एका दृष्टीने पश्चिम बंगालमधील भाजपाचा ऐतिहासिक प्रवेश आणि अन्य राज्यांतील परिवर्तनाच्या लाटा पाहता, जनतेला पारंपरिक राजकारणाच्या विभ्रमातून बाहेर पडावयाचे आहे आणि योग्य व समर्थ पर्याय समोर आल्यास परिवर्तनाची संधी साधण्यासाठी समाज उत्सुकही आहे. विधानसभा निवडणुका हा आता केवळ त्या-त्या राज्यांच्या राजकीय विश्लेषणापुरता मर्यादित मुद्दा राहिलेला नाही. देशाच्या दीर्घकालीन राजकारणाचे व दिशेचे नवे संकेतही त्यामध्ये दडलेले आहेत. भाजपाला मिळालेला संकेत स्पष्ट आहे. तो आश्वासक आणि आव्हानात्मकही आहे. काँग्रेस आणि परिवारवादी राजकारण करणाऱ्या पक्षांना या कौलात स्वतःसाठी कोणते संकेत दिसतात आणि त्यांचा ते कसा अर्थ लावतात, यावर देशाच्या राजकारणाची पुढची दिशा ठरेल.

## आंतरराष्ट्रीय

# उत्तर कोरियात महिला उत्तराधिकारी?

प्रा. जयसिंग यादव

उत्तर कोरियातील सत्ताकेंद्राच्या आत चालणाऱ्या सूक्ष्म संकेतांची भाषा समजून घ्यायची असेल तर केवळ अधिकृत घोषणा किंवा धोरणे पाहून चालत नाही तर प्रतीके, प्रतिमा आणि सार्वजनिक उपस्थिती यांचे बारकाईने विश्लेषण करावे लागते. किम जोंग ऊन यांची मुलगी किम जू ए ची अलिकडील काळातील सार्वजनिक उपस्थिती आणि पोशाखावरून उभ्या राहिलेल्या चर्चेचा संदर्भ याच चौकटीत समजून घ्यावा लागतो. वरकरणी हा विषय 'फॅशन'शी संबंधित वाटू शकतो; मात्र प्रत्यक्षात तो सत्तेच्या वारशाशी आणि राजकीय संदेशवहनाशी जोडलेला आहे. उत्तर कोरियात पाश्चिमात्य संस्कृतीविषयी कठोर निर्बंध आहेत. २०२० मध्ये लागू करण्यात आलेल्या 'रिॲक्शनरी आयडियोलॉजी अँड कल्चर रिजेक्शन ॲक्ट'अंतर्गत विदेशी पोशाख, शैली आणि सांस्कृतिक प्रभावांवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत किम जू ए वारंवार लेदर जॅकेट, लक्झरी ब्रँडचे कपडे किंवा पाश्चिमात्य हेअरस्टाईलमध्ये दिसणे ही साधी बाब राहात नाही. उलट, ती एक राजकीय 'संकेत-भाषा' बनते. सामान्य नागरिकांसाठी निषिद्ध असलेले सत्ताधारी कुटुंबातील सदस्य खुलेपणाने वापरत असतील, तर त्यातून विशेषाधिकार आणि वेगळेपणाचा संदेश स्पष्टपणे दिला जातो. २०१३ मध्ये जन्मलेली किम जू ए प्रथमच २०२२ मध्ये सार्वजनिकरीत्या दिसली, तेव्हा ती आपल्या वडिलांसोबत आंतरखंडीय क्षेपणास्त्रासमोर फिरताना दिसली होती. ही उपस्थिती केवळ कौटुंबिक क्षण नव्हती, तर ती एक नियोजित राजकीय दृश्यरचना होती. किमला लहान वयातच अशा महत्त्वाच्या क्षणांमध्ये पुढे आणणे, हे तिच्या संभाव्य उत्तराधिकारी म्हणून तयार होण्याच्या प्रक्रियेचा भाग मानले जाते.
अलिकडच्या काळात या मुलीच्या पोशाखात आणि वावरात दिसणारा आत्मविश्वास, हे या प्रक्रियेचे पुढचे पाऊल आहे. विशेष म्हणजे तिच्या कपड्यांमध्ये दिसणारे लक्झरी ब्रँड्स हे केवळ फॅशन निवड नसून सत्तेचे आणि प्रतिष्ठेचे प्रतीक आहेत. साधारण उत्तर कोरियन नागरिकांसाठी असे कपडे उपलब्ध नाहीत. किंबहुना, त्यांची कल्पनाही करणे कठीण आहे. त्यामुळे किम जू एचा प्रत्येक पोशाख तिच्या 'अलिप्त' सामाजिक स्थानाचा पुनरुच्चार करतो. या संदर्भात तिची आई री सोल जू हिची भूमिका महत्त्वाची ठरते. री सोल जू स्वतः पाश्चिमात्य शैलीतील कपड्यांसाठी ओळखली जाते आणि तिच्या माध्यमातून उत्तर कोरियामध्ये 'एलिट फॅशन'ची एक वेगळी प्रतिमा तयार करण्यात आली आहे. किम जू एला तशाच प्रकारच्या पोशाखात सादर करणे, हे केवळ आई-मुलीच्या नात्यापुरते मर्यादित नाही, तर सत्तेच्या सातत्याचा आणि प्रतिमानिर्मितीचा भाग आहे. उत्तर कोरियाच्या राजकारणात 'इमेज रिप्लिकेशन' म्हणजेच प्रतिमेची पुनरावृत्ती ही जुनी आणि प्रभावी पद्धत आहे. पूर्वसुरींच्या प्रतिमेचे अनुकरण करून किम जोंग ऊन यांनी आपल्या नेतृत्वाच्या सुरुवातीच्या काळात जनमानसात आपली ओळख निर्माण केली होती. त्याच धर्तीवर किम जू एला विशिष्ट पोशाख, शैली आणि सार्वजनिक उपस्थितीद्वारे सादर केले जात आहे.



यामुळे जनतेच्या मनात तिची प्रतिमा हळूहळू 'सत्तेची नैसर्गिक वारस' म्हणून तयार केली जात आहे.

या सर्व प्रक्रियेमध्ये 'वर्कर्स पार्टी ऑफ कोरिया' च्या प्रचार यंत्रणेची भूमिका महत्त्वाची आहे. किम जू एला सामान्य नागरिकांपासून वेगळे, विशेष आणि प्रभावशाली दाखवणे हे या यंत्रणेचे उद्दिष्ट असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. लेदर जॅकेट, फर कोट किंवा महागडे पोशाख हे केवळ कपडे नसून सत्तेचे दृश्यमान प्रतीक आहेत. तथापि, या चित्राचा आणखी एक पैलूही आहे. उत्तर कोरियामध्ये पाश्चिमात्य संस्कृतीवर बंदी असली, तरी प्रत्यक्षात बाह्य प्रभाव पूर्णपणे थांबवणे शक्य झालेले नाही. परदेशात काम करणारे कामगार, तस्करीच्या मार्गाने येणारी उत्पादने आणि डिजिटल माध्यमांमुळे लोकांमध्ये विदेशी ब्रँड्स आणि फॅशनची माहिती वाढत आहे. या पृष्ठभूमीवर किम जू एचा 'स्टाईल आयकॉन' म्हणून उदय होणे राजकीयच नव्हे, तर सामाजिक बदलाचेही द्योतक ठरू शकते; मात्र या सर्व चर्चेचा केंद्रबिंदू एकच आहे- सत्ता. उत्तर कोरियामध्ये फॅशन ही वैयक्तिक अभिव्यक्ती नसून सत्तेचे आणि नियंत्रणाचे साधन आहे. किम जू एचे कपडे, तिची सार्वजनिक उपस्थिती आणि तिच्याभोवती तयार होणारी प्रतिमा हे सर्व एकत्रितपणे पाहिल्यास भविष्यातील नेतृत्वाची पायाभरणी असल्याचे स्पष्ट होते. किम जू एच्या फॅशनकडे केवळ 'पाश्चिमात्य प्रभाव' किंवा 'किशोरवयीन बंडखोरी' म्हणून पाहणे हा मोठा गैरसमज ठरेल. ती एक काळजीपूर्वक आखलेली रणनीती आहे. त्यात प्रतिमा, सत्ता आणि वारसा यांचे सूक्ष्म मिश्रण दिसते. उत्तर कोरियाच्या बंदिस्त व्यवस्थेमध्येही बदलाचे संकेत कसे उमटतात, याचे हे एक प्रभावी उदाहरण म्हणता येईल.

उत्तर कोरियामधील सत्ताकारणाची रचना केवळ राजकीय व्यवस्थेपुरती मर्यादित नाही, तर प्रतीक, प्रतिमा आणि नियंत्रित कथानक यांच्या सूक्ष्म गुंफणीतून उभी राहते. अशा व्यवस्थेत एखाद्या व्यक्तीची सार्वजनिक उपस्थिती, तिचे हावभाव, तिचा पोशाख या सर्व गोष्टींना स्वतंत्र अर्थ प्राप्त होतो. वरकरणी हा विषय 'फॅशन'चा वाटत असला, तरी प्रत्यक्षात सत्तेच्या सातत्याचा, उत्तराधिकाराच्या राजकारणाचा आणि राज्य-नियंत्रित प्रतिमानिर्मितीचा भाग आहे. उत्तर कोरिया ही अशी व्यवस्था आहे, जिथे पाश्चिमात्य संस्कृती अधिकृतरीत्या 'विघातक' मानली जाते. २०२० मध्ये लागू करण्यात आलेल्या 'रिॲक्शनरी आयडियॉलॉजी अँड कल्चर रिजेक्शन ॲक्ट'अंतर्गत विदेशी कपडे, चित्रपट, संगीत आणि जीवनशैलीवर कठोर निर्बंध लादले गेले. सामान्य नागरिकांसाठी जीन्स, लेदर जॅकेट किंवा लक्झरी ब्रँड्सचे कपडे केवळ दुर्मिळच नाहीत, तर अनेकदा बेकायदेशीरही मानले जातात. अशा परिस्थितीत किम जू ए वारंवार लेदर जॅकेट, महागडे कोट किंवा पाश्चिमात्य शैलीतील पोशाख परिधान करताना दिसते, ही बाब स्वतःमध्येच एक ठळक राजकीय संदेश बनते. हा संदेश साधा आहे, तो म्हणजे सत्ता आणि सामान्य नागरिक यांच्यातील स्पष्ट भेद. सामान्यांसाठी निषिद्ध आहे, ते सत्ताधारी वर्गासाठी 'विशेषाधिकार' आहे. किम जू एच्या पोशाखातून हा विशेषाधिकार केवळ दिसत नाही, तर तो जाणीवपूर्वक अधोरेखित केला जातो. उदाहरणार्थ, फ्रेंच लक्झरी ब्रँड ख्रिश्चन डायर'च्या महागड्या जॅकेटमध्ये तिची उपस्थिती ही केवळ फॅशन निवड नसून एक प्रतीकात्मक घोषणा आहे.

सत्तेच्या केंद्रात असलेल्यांना वेगळे नियम असतात. किम जू एची शैली काही प्रमाणात अनुकरणीय ठरू शकते. तिच्या पोशाखाची नक्कल करण्याची इच्छा काही लोकांमध्ये निर्माण होत असल्याचे संकेतही दिसतात. हे राज्याच्या कठोर नियंत्रणाला एक सूक्ष्म आव्हान मानले जाऊ शकते; मात्र या सर्व प्रक्रियेत सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'दुहेरी निकष'. सामान्य नागरिकांसाठी जे नियम कठोरपणे लागू केले जातात, तेच नियम सत्ताधारी वर्गासाठी शिथिल असतात. हा विरोधाभास केवळ सामाजिक असमानतेचे प्रतीक नाही, तर सत्तेच्या केंद्रीकरणाचेही द्योतक आहे. किम जू एचे कपडे या विरोधाभासाचे दृश्य रूप बनतात. उत्तर कोरियासारख्या बंदिस्त व्यवस्थेमध्ये बदलाचे संकेत उघडपणे दिसत नाहीत, तर अशा सूक्ष्म गोष्टींमधूनच प्रकट होतात. किम जू एच्या पोशाखातील पाश्चिमात्य छटा, तिची वाढती सार्वजनिक उपस्थिती आणि तिच्याभोवती उभा राहणारी 'विशेषाधिकाराची आभा' हे सर्व मिळून एक मोठी कथा सांगतात. ही कथा केवळ एका मुलीच्या फॅशनची नाही, तर सत्तेच्या सातत्याची, प्रतिमानिर्मितीची आणि भविष्यातील नेतृत्वाच्या तयारीची आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# लोणार सरोवराचे खगोल दर्शन

जागतिक दर्जाच्या लोणार सरोवरात होणारे बदल पाण्याची वाढ अशा वैज्ञानिकदृष्ट्या संशोधन करण्यासाठी गेल्या महिन्यात खगोल दर्शन महोत्सव आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आणि आंतरराष्ट्रीय डार्क स्काय सप्ताहाच्या पृष्ठभूमीवर या महोत्सवात डार्क स्काय संकल्पनेने अंतर्गत दुर्बीणद्वारे तारे व ग्रह निरीक्षण, नक्षत्र दर्शन खगोलशास्त्रीय चर्चासत्रे झालीत; ज्यामुळे खगोल पर्यटनाला मोठी चालना मिळाली. उल्कापातामुळे निर्मित या अद्वितीय विवराचा अभ्यास करणे, प्रकाश प्रदूषणापासून मुक्त ठिकाणी आकाश दर्शन घडवणे, या परिसरात रात्रीचे आकाश स्वच्छ दिसण्यासाठी काही काळ सार्वजनिक विद्युत व्यवस्था बंद ठेवून डार्क स्काय अनुभव देण्यात आला. लोणारला डार्क स्काय साईटचा दर्जा मिळण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे; ज्यामुळे देश-विदेशातील पर्यटक आकर्षित होतील. लोणार सरोवराची निर्मिती अंदाजे ५२ हजार वर्षांपूर्वी उल्कापातामुळे झाली असून हे बेसॉल्ट खडकातील जगातील एकमेव मोठे आघाती विवर आहे. वैज्ञानिकदृष्ट्या या ठिकाणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शासनाच्या पर्यटन विभागाच्या वतीने आयोजित हा महोत्सव पर्यटकांना अवकाशाचे विलोभनीय दर्शन घडविणारा ठरला आहे.

लोणारचा प्रचार आंतरराष्ट्रीय स्तरावर व्हावा यासाठी येथे विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये एमटीडीसी पर्यटक निवास, पर्यटक अभ्यागत केंद्र, तारांगण, प्रयोगशाळा योग केंद्राचा समावेश आहे. लोणार खगोल दर्शन हा उपक्रम केवळ खगोलशास्त्रापुरता मर्यादित नसून तो पर्यावरणाशीही निगडित आहे. शाश्वत पर्यटनाला यामुळे नवी दिशा मिळेल. ज्वालामुखीच्या उद्रेकातून निर्माण झालेल्या महाराष्ट्रातील दख्खन बेसॉल्टच्या पठारावर उल्का आघाताने तयार झालेले हे विवर आहे. काहींच्या मते, यापूर्वी हे ज्वालामुखीच्या केंद्रीय उद्रेकातून तयार झाले असावे. मात्र हे नेमके केव्हा अस्तित्वात आले यावर अद्याप एकमत झालेले नाही. परंतु अलिकडील काळात झालेल्या संशोधनावरून अवकाशातून अतिवेगाने आलेल्या उल्केच्या आघातानेच असे प्रचंड आकाराचे विवर निर्माण होऊ शकते हे तेथील खडक, खनिजे व माती यांच्या नमुना चाचणी अभ्यासातून शास्त्रज्ञांनी सांगितले आहे. लोणार सरोवर निर्मितीचा हा इतिहास असला तरी विवर निर्मितीचे दोन वैज्ञानिक प्रवाह आहेत.

सरोवराची निर्मिती ज्वालामुखीच्या केंद्रीय मुखाने झाली असा सिद्धांत १९११ मध्ये लिहिलेल्या शोधनिबंधात टुशे व ख्रिस्ती यांनी केला आहे. त्यांनी १८४० ते १९१० पर्यंत सर्व शोधनिबंधांचा अभ्यास करून त्याचा आढावा घेतला, परंतु त्यानंतर झिग्रन व राव (१९५४), नंदी व देव (१९६१), बडवे व कुमारन (१९९२) यांनी भूशास्त्रीय, भूवैज्ञानिक व रासायनिक अभ्यास केला. त्यांनी विवर ज्वालामुखीच्या उद्रेकामुळेच झाले हे स्पष्ट केले. यातील वनस्पती मोठ्या प्रमाणात कार्बन डाय ऑक्साईड सोडतात. तो वायू पाण्यात विरघळतो व आम्ल तयार होते. त्याचे हायड्रोजन सल्फाईड्सवर कार्य होऊन सल्फाईड वायू तयार होतो. याच प्रक्रियेतून आम्लारी क्षार तयार होतात. ही क्रिया प्रकाश संश्लेषणेद्वारा होते. त्यामुळेच पाणी अजूनही खारटपणा सोडत नाही, असे संशोधकांचे मत आहे. सरोवराचे पाणी पिण्याला अयोग्य असले तरी त्यात स्नान केल्यावर त्वचेचे अनेक आजार बरे होतात असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. या पाण्यापासून साबण तयार होते. ती स्नानासाठी चांगली असते असेही काहींचे म्हणणे आहे. याचा पुरावा इतिहासात सापडतो. सरोवराची पाणी पातळी प्रचंड वाढली आहे गेल्या दोन वर्षांत झालेल्या अवकाळी पावसामुळे सरोवराची पातळी लक्षणीय वाढली आहे. हवामान बदलामुळे परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे सरोवरात अतिरिक्त पाणी जमा झाले. भूजल पातळीत जाण्याचे मार्ग बंद झाल्याने पाणी साचून राहत आहे. लोणार विकास आराखड्यांतर्गत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र शासनाने तरतूद केली आहे. या वर्षाकरिता अंदाजे २.२१ कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. एकूण १५०.८३ कोटी रुपयांचा सुधारित विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. या निधीतून लोणार सरोवर परिसरात पर्यटकांसाठी पायाभूत सुविधा, सौंदर्यीकरण, ऐतिहासिक मंदिरांचे जतन व संवर्धन करण्याचे काम सुरू आहे. जागतिक वारसा स्थळ म्हणून लोणारच्या संवर्धनासाठी आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी हे काम केले जात आहे. उल्कापातातून निर्माण झालेले लोणार सरोवर हे राज्यातील महत्त्वाचे नैसर्गिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळ विकासाला गती देण्यासाठी सर्व कामे निर्धारित कालावधीत व उच्च दर्जाने पूर्ण करावीत असे निर्देश आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांनी वन विभाग, नगर परिषद तसेच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत..

९८८१७१७८२८

## प्रासंगिक

विजय पांढरीपांडे

# व्हॉट्सॲप - एक वैतागवाडी!

सोशल मीडियाचे जसे काही फायदे आहेत, तसे तोटेही आहेत. घ्यायचे ते घ्या, नको ते सोडून द्या असा युक्तिवादही केला जातो. पण नको असलेल्या मेसेजेसमुळे आपली मेमरी वाया जाते त्याचे काय? शिवाय हे फालतू मेसेजेस डिलिट करीत बसणे हा आणखीन एक मोठा उद्योग! त्याने तर बोटे दुखतात. बहुतेक लोक गुड मॉर्निंग, शुभ प्रभातने सुरुवात करून गुड नाईटपर्यंत वैताग आणतात. शिवाय आजकाल धार्मिक व्हिडीओ, एकदम उफाळून आलेले धर्माविषयीचे प्रेम, राष्ट्रभक्ती हे ओघाने आलेच. जणू इथे व्यक्त केल्याशिवाय ते देशभक्त, धर्मनिष्ठ ठरणार नाहीत! आपल्याला आलेले मेसेज दुसऱ्याच्या उपयोगाची असो, नसो ती फॉरवर्ड केलीच पाहिजे असे बहुतेकांना वाटते. त्याशिवाय यांना चैन पडत नाही. मोबाईल पचत नाही! मग काही आंबटशौकीन लोक पी जे पाठवतात. नॉनव्हेज जोक्स, व्हिडीओ देखील पाठवतात. या देवघेवीमुळे म्हातारचळ लागलेल्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढली आहे असे दिसते!

आता व्हॉट्सॲप ग्रुप तयार करणे हा देखील एक रिकामपणाचा उद्योग झाला आहे. त्यात कुटुंबाचा वेगळा ग्रुप. कुटुंबातील विशिष्ट भावा-बहिणींचा वेगळा ग्रुप. ऑफिसचा, मित्रांचा, मैत्रिणींचा, असे वेगवेगळे प्रकार. भाज्यांचे, चटण्या, कोशिंबिरीचे नसतील एव्हढे या ग्रुपचे सबग्रुप असतात. काही माहितीच्या देवाणघेवाणीाठी, तातडीची सूचना पाठविण्यासाठी याचा निश्चितच चांगला फायदा होतो. पण इथेही रिकामटेकडी माणसे गुड मॉर्निंग, गुड नाईटपासून तर फालतू मेसेजेस फॉरवर्ड करीत असतात. शिवाय गणपती, देवी, हनुमान या देवांवरील श्रद्धा भक्ती ही व्हॉट्सॲप फॉरवर्डशिवाय सिद्ध होत नाही अशीही त्यांची गोड समजूत असते. त्यातच हा मेसेज एकवीस जणांना फॉरवर्ड करा, पुण्य मिळेल अशी अंधश्रद्धा देखील इथे फोफावलेली दिसते.

सगळ्यात जास्त वैताग असतो तो विशिष्ट छंद जोपासणाऱ्या मंडळींचा. इथे सिने संगीत, शास्त्रीय संगीत, नाट्यप्रेमी, साहित्यिक, कवी, शिक्षणप्रेमी, कलावंत, चित्रकार अशा छंदिष्ट लोकांचे ग्रुप असतात. इथे कुणी एक जण म्होरक्या पुढारी असतो. त्याला ॲडमिन म्हणतात. हे महाशय आपण एखाद्या मोठ्या आयटी कंपनीचे सीईओ किंवा प्रेसिडेंट वगैरे असल्यासारखे वेगळ्याच तोऱ्यात वागतात. कुणाला घ्यायचे, कुणाला वगळायचे असे एचआर हेडचे अधिकार यांच्या हातात (बोटात) असतात. इथे एकमेकांची स्तुती करणे, तू मला खाजव मी तुला खाजवतो असे परस्पर कौतुक सोहळे चालतात. काही ग्रुपवर तर नळावर बायकांची जशी भांडणे होतात, तसे वाक्‌युद्ध चालते. यात पक्षीय, जातीय राजकारण आले तर मग विचारायलाच नको. कधी कधी ही वादावादी इतकी टोकाला जाते की ॲडमिन महाशयांना मध्यस्थी करून कुणाला तरी ग्रुपमधून काढावे लागते. कारण इथे मेरे मुर्गीकी एकही टांग असा अट्टहास धरणारी हटवादी, आग्रही मंडळीच जास्त असतात. प्रत्येकाचा इगो सांभाळणे ही ॲडमिनसाठी चक्क तारेवरची कसरत असते. या ग्रुपवर एकाने वाढदिवसाच्या कुणाला शुभेच्छा दिल्या की मग इतरांना तो उपचार पाळणे भाग पडते. तीच कथा कुणी दगावल्याची. मग तुम्ही त्या व्यक्तीला ओळखत नसला, तुम्ही ती व्यक्ती कधी पाहिली नसली तरी ओम शांती, सांत्वना संदेश हे उपचार पाळावेच लागतात. एरवी तुम्ही शिष्ट, अहंकारी ठरता. कुणाला कुठले अवॉर्ड मिळते, कुणाचा कुठे सत्कार होतो तेव्हा ग्रुपवर अभिनंदनाचा वर्षाव सुरू होतो. तेव्हा ग्रुपला ट्रॅक्टरवरून झेंडूच्या पाकळ्यांचा वर्षाव होणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या मिरवणुकीचे स्वरूप येते! इथे अनेक जण आपोआप सुप्रसिद्ध लेखक, वक्ते होतात. कवी मंडळींचे तर विचारूच नका. व्हॉट्सॲप ग्रुपवर अनेकांना प्रतिभेचे गरुड पंख फुटतात. मग कौतुकाची थाप देण्याचे उपचार प्रत्येकाला पाळावे लागतात. स्तुतिपाठक एकमेकांना आवडतात. बाकीचे शिष्ट, मग्रूर म्हणून तांदळातल्या खड्यासारखे बाहेर पडतात, फेकले जातात.

काही जणांना मोठमोठ्या पोस्ट पाठवून व्यक्त व्हायचा उमाळा येतो या ग्रुपवर. घरी एकमेकांशी न बोलणारी मंडळी इथे मात्र नको तितकी ॲक्टिव्ह असतात. घरातील समस्या त्यांच्या कानी देखील नसतात. पण इथे मत द्यायला, उपदेश करायला ते एकदम विचारवंत होतात.

आपल्या लेखनाचे, छंदाचे, कौतुक करवून घ्यायला लोकांना व्हॉट्सॲप ग्रुप हे फुकटचे व्यासपीठ मिळाले असते. त्यामुळे इथे प्रत्येकाला स्वतःची जाहिरातबाजी करण्याची हौस भागवता येते. कधी कधी याचा इतका अतिरेक होतो की काही मंडळी स्वतःचे हसे करून घेतात. पण त्याची त्यांना खबरबात देखील नसते. हे मेसेजेस बघण्यात, डिलिट करण्यात, त्यावर व्यक्त होण्यात आपला किती अमूल्य वेळ खर्च होतो याचे आपल्याला कुणालाच भान नसते. यातून काहीच साध्य होत नाही. थोडेफार मनोरंजन होत असेल कुणाचे. ज्याला टाईमपास म्हणतात ते साधत असेल कुणासाठी. पण काही थोडे चांगल्या माहितीच्या देवाणघेवाणीतून होणारे अपवाद सोडले तर कुणाच्याच पदरी काही पडत नाही. हा वेळ आपण चांगले पुस्तक वाचण्यासाठी, चांगले गाणे ऐकण्यासाठी, चांगला सिनेमा, एखादे नाटक बघण्यासाठी, आपल्या घरी मुलांशी गप्पा मारण्यासाठी, कौटुंबिक समस्या सोडविण्यासाठी, काही नवे शिकण्यासाठी, आपला राहून गेलेला छंद जोपासण्यासाठी सहज घालवू शकतो. खरे तर ते जास्त गरजेचे असते आपल्यासाठी. पण आपल्यालाच काय हवे, काय गरजेचे आहे हे कळेनासे झाले आहे. आपली स्थिती भरकटलेल्या वाटसरूसारखी झाली आहे. हातचे सोडून पळत्याच्या मागे लागणाऱ्या वेड्यासारखी आपली केविलवाणी स्थिती झाली आहे. या नव्या तंत्रज्ञानात सगळेच काही वाईट नाही. महत्त्वाच्या बातम्यांची देवाणघेवाण, प्रत्यक्ष जाऊन आमंत्रण देण्यापेक्षा इथे टाकून वेळेची बचत, काही चांगल्या माहितीत भर, असे मोजके फायदे देखील आहेत. पण या आदानप्रदान होणाऱ्या माहिती जंजाळात खरे काय, खोटे काय, कामाचे उपयोगाचे काय, फेक काय हे समजणे फार कठीण झाले आहे. यात टाईमपासपेक्षा (टाईम वेस्ट), वेळेचा दुरुपयोग जास्त आहे हे निश्चित. हे महाभारतातील चक्रव्यूहासारखे आहे. आत शिरणे तसे सोपे, पण त्यातून बाहेर येणे तितकेच कठीण!

७६५९०८४५५५

## ऊन-वादळी वाऱ्याचा खेळ

राज्यातील अनेक भागांत सध्या हवामानाचा अनिश्चित खेळ सुरू असून कडक उन्हासोबत अचानक येणारे वारे आणि बदलते वातावरण यामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. एप्रिल-मे महिन्यात अपेक्षित असलेली स्थिर उष्णता यंदा वाऱ्याच्या झटक्यांनी आणि तापमानातील चढ-उतारांनी बाधित झाली आहे. परिणामी शेतीपिकांवर गंभीर परिणाम दिसून येत आहे. भाजीपाला बागायती पिकांना या बदलत्या हवामानाचा फटका बसत आहे. जोरदार वाऱ्यामुळे फळांची गळती होत असून कडक उन्हामुळे पिकांची वाढ खुंटते आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या खर्चाने उभे केलेले पीक काही तासांतच नुकसानग्रस्त होत असल्याने आर्थिक संकट अधिक गडद होत आहे. हवामानातील हा बदल केवळ नैसर्गिक नाही तर दीर्घकालीन पर्यावरणीय असंतुलनाचाही परिणाम आहे. वाढते तापमान, जंगलतोड आणि बदललेले पर्जन्यमान यामुळे ऋतूंचा ठरलेला क्रम ढासळत आहे. याचा सर्वात मोठा फटका शेती क्षेत्राला बसत आहे, जे आधीच अनेक अडचणींना सामोरे जात आहे.

सरकारकडून तत्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना, जसे की संरक्षित शेती, जलसंधारण आणि हवामान-स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर, यावर भर देणे आवश्यक आहे. आज गरज आहे ती केवळ मदतीची नाही, तर शाश्वत शेती व्यवस्थेची. अन्यथा ''उन्ह वाढली-वाऱ्याचा खेळ हा केवळ हवामानाचा विषय न राहता शेतकऱ्यांच्या आयुष्याचा कायमचा प्रश्न ठरेल.

**मुनिश्वर मलेवार**/देव्हाडा

## बालसुरक्षेसाठी समन्वय आणि जागरूकता अपरिहार्य

महिला-बाल अपराध प्रतिबंध विभागाच्या अहवालानुसार

## वाचक पत्रे

अलिकडील काळात बालकांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये झालेली वाढ हे वृत्त वाचनात आले. बदलती कुटुंबव्यवस्था, पालकांची व्यस्त जीवनशैली आणि तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव यामुळे बालसुरक्षेबाबतचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. शासन विविध योजना आणि कायदे राबवत असले तरी त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसह समाजातील सर्व घटकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

शाळांमध्ये बालसुरक्षा शिक्षण तसेच मुलांना योग्य-अयोग्य स्पर्शाची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे. बालसुरक्षा ही केवळ शासनाची जबाबदारी नसून पालक, शाळा, समाज आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच ती सुनिश्चित होऊ शकते.

**विश्वनाथ पंडित**/ठाणे

## भारतीय रेल्वे

भारतीय रेल्वे ही जगातील सर्वात मोठ्या रेल्वे नेटवर्क पैकी एक आहे. नेटवर्कच्या बाबतीत भारतीय रेल्वे जगात चौथ्या क्रमांकावर आहे. गरीब श्रीमंत सर्वांना परवडणारी आणि सर्वांना सामावून घेणारी असल्याने भारतात दररोज लाखो नागरिक भारतीय रेल्वेने प्रवास करण्यास पसंती देतात.

ही पसंती लक्षात घेता रेल्वे देखील प्रवाशांना वेगवेगळया सुविधा देते. गेल्या काही वर्षांत रेल्वे प्रवास जास्त आरामदायी, जलद गतीने आणि स्वस्तात व्हावा यासाठी वेगळे उपक्रम रेल्वे राबवित आहे. काही सुविधा मोफत आहेत त्या आपण जाणून घेऊन त्याचा फायदा करून घ्यावा. ऑनलाइन बूकिंग असल्यास वेळीच अपडेट्स दिल्या जातात. एसी प्रवासात बेडरोल सेवा पूर्वीपासून दिली जाते. मोफत वैद्यकीय सेवा तसेच कोणताही समस्या उद्भवल्यास १३९ या क्रमांकावर कॉल केल्यास त्वरित कर्मचारी हजर होतो आणि समस्येचे निराकरण होते. डिजिटल सेवा, ई कॅटरिंग सेवेद्वारे प्रवाशांना जागेवरच दर्जेदार अन्न मिळण्याची सुविधा उपलब्ध आहे. टॉयलेट्स बऱ्यापैकी स्वच्छ असतात. अशा अनेक आपल्याला माहीत नसलेल्या सुविधा भारतीय रेल्वे आपल्याला पुरवत असते.

बऱ्याच सुविधा आधीपासूनच आहेत. परंतु त्याबाबत रेल्वे अधिक दक्ष झालेली आढळून येते. या बाबतीत आपण कृतज्ञ असले पाहिजे. प्रवासी म्हणुन आपलीही काही जबाबदारी असते ह्याचे प्रत्येकाने भान ठेवावे. काही दुष्प्रवृत्तीचे नागरिक रेल्वेतील सीट फाडणे, तोडफोड करणे, अस्वच्छता पसरविणे, विनाकारण साखळी ओढणे, प्लास्टिक बॉटल, खाद्यपदार्थ किंवा चॉकलेटचे

वेष्टन, चहा कॉफीचे ग्लास, कागदी प्लेट्स इत्यादी इत्यादी कचरा सर्रास पायाखाली टाकतात किंवा खिडकीतून बाहेर फेकतात. सर्व बोगीत. डस्ट बीन्स असतात. त्याचा वापर करावा. छोट्या छोट्या गोष्टीत स्वतःला वळण लावावे. आपली रेल्वे आपली जबाबदारी या धारणेतून प्रवास केल्यास प्रवास अधिक आनंददायी आणि सुखकर होईल. गरज आहे फक्त जबाबदार, सुजाण नागरिक बनण्याची.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बीडच्या 32 नवउद्योजिकांची झेप, जन शिक्षण संस्थान बीडच्या कार्यालयात संपन्न झाला मार्गदर्शन कार्यक्रम

तभा. वृत्तसेवा

**बीड** | दीनदयाल शोध संस्थान,जन शिक्षण संस्थान बीड कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (भारत सरकार) आणि भारतरत्न नानाजी देशमुख उपजीविका केंद्र, मथुरा महिला उद्योग प्रशिक्षण प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने 'उद्योजकता विकास व मार्केटिंग मार्गदर्शन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बीडमधील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना संभाजीनगरसारख्या मोठ्या बाजारपेठेत स्थान मिळवून देण्याच्या उद्देशाने हा मेळावा घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्त्या संध्याताई कुलकर्णी होत्या. तसेच सेवानिवृत्त अभियंता श्री. उत्तम शिरसाट , सौ.जयश्री शिरसाट, सेवानिवृत्त प्राचार्य सौ अंजली भालचंद्र, आणि जन शिक्षण संस्थान बीडचे संचालक श्री. गंगाधरजी देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

बीडच्या उत्पादनांचे प्रदर्शन

या कार्यक्रमात ३२ नवउद्योजिकांनी आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने खाद्यपदार्थ कुरडई, पापड, शेवई, लोणचे, विविध चटण्या, उपवासाची भाजणी. हस्तकला व फॅशन मध्ये आर्टिफिशियल ज्वेलरी, मोत्याची रांगोळी, ज्यूट क्राफ्ट, कापडी पिशव्या, एम्ब्रॉयडरी वर्क उलन निटिंग ,ब्लाऊज, नऊवारी साडी. पारंपारिक कलेमध्ये महाराष्ट्रीयन गोधडी.

प्रास्ताविकात संचालक श्री. गंगाधरजी देशमुख यांनी सांगितले की, "भारतरत्न नानाजी देशमुख उपजीविका केंद्रांतर्गत महिलांचा एक मोठा गट तयार झाला आहे. आता आमचे मुख्य लक्ष उत्पादनांची क्वालिटी, पॅकिंग आणि प्रभावी मार्केटिंग यावर असून, संभाजीनगर येथे या वस्तूंसाठी लवकरच भव्य विक्री केंद्र सुरू करण्यात येणार आहे."

# डी.डब्ल्यू.पी.एस. वंडरलँड शाळेचे शानदार उद्घाटन

### शिक्षणानेच समृद्धी व उन्नती; शैक्षणिक उपक्रमांना सदैव पाठिंबा – पंकजा मुंडे

### वंडरलँडमुळे परळीत आधुनिक शिक्षणाचे दालन खुले – धनंजय मुंडे

### गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर; 'परळी पॅटर्न' उभारणार – किरण गित्ते






तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी संचलित डी.डब्ल्यू. पी.एस. वंडरलँड शाळेचे उद्घाटन दि. २ मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजाताई मुंडे व आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी किरण गित्ते (आयएएस), माजी आमदार संजय दौंड, नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. प्राचार्य डॉ. श्रीकांत पाटील यांनी प्रास्ताविक केले, तर दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना किरण गित्ते यांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रेरणेने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले. 'परळी पॅटर्न' तयार करण्यासाठी दर्जेदार शिक्षणावर भर दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पंकजाताई मुंडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज अधोरेखित करत अशा उपक्रमांना शासनाचा व वैयक्तिक पातळीवर सदैव पाठिंबा राहील, असे सांगितले.

धनंजय मुंडे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत वंडरलँडमुळे परळीतील विद्यार्थ्यांना महानगरांप्रमाणे शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होतील, असे नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश मुंडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्या डॉ. स्वप्नाली टाले यांनी केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वारकरी किर्तन परंपरा कशी असावी हे संत बंकटस्वामी महाराज यांची देणं ; रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर.

## श्रीक्षेत्र नेकनूर येथे भव्य रामकथेचा समारोप



तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी )** | किर्तन परंपरा कशी असावी हे संत बंकटस्वामी महाराज यांनी वारकरी संप्रदायाला सांगितले. अभंगाचा भाव जसा असेल तश्या चाली स्वामी महाराज यांनी लावल्या.वारकरी सांप्रदायात संत बंकट स्वामी महाराज यांचे संपादकीय कार्य खूप मोठे आहे. असे प्रतिपादन श्री ह भ प रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांनी केले. संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८२ पुण्यतिथी उत्सवात रामकथेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थित श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प नाना महाराज कदम श्री ह भ प सुरेश महाराज जाधव श्री ह भ प गणेश महाराज पांडे श्री ह भ प दिनेशानंद शास्त्री यांच्या सहा हजारो भावीक भक्त उपस्थित होते.

श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त भव्य संगीत तुलसी श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले होते कथा प्रवक्ते श्री ह भ प संजय महाराज पाचपोर यांनी कथेच्या समारोपप्रसंगी संत बंकट स्वामी महाराज यांचे वारकरी संप्रदायातील कार्य अलौकिक आहे.किर्तन परंपरा कशी असावी हे संत बंकट स्वामी महाराज यांची देण आहे.

देशासाठी, देवासाठी आणि धर्मासाठी जीवन उपयोगी आले पाहिजे.रावण जर नारद रुपी साधूच ऐकत असेल तर आपणही संताच ऐकलं पाहिजे. मर्यादा हा स्त्री जीवनाचा अलंकार आहे. सीतेने मर्यादा ओलांडली तर दु:ख सहन कराव लागलं. आपली स्तुती ऐकताना दु:ख होत आणि दुसऱ्याचं स्तुती करताना ज्याला आनंद होतो तो साधू आहे.सुग्रीव सत्ता सोडतो संपत्ती सोडतो भावाला सोडतो, पत्नीला सोडतो पण साधूला सोडत नाही.

## नसरापूर घटनेतीलआरोपीस फाशीची शिक्षा द्या



तभा. वृत्तसेवा

**बीड ( प्रतिनिधी)** | पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात असणाऱ्या नसरापूर या गावांमध्ये केवळ चार वर्षाच्या अत्यंत निरागस बालिकेवर च्या विकृत व्यक्तीने केलेल्या अत्याचाराचा व्यापक स्तरावर निषेध व्यक्त करण्यासाठी मंगळवारी जिल्हाधिकारी महोदयांना परशुराम हिंदू सेवा संघ बीड व बीड शहरातील समाजशील विचारांच्या व्यक्तीने निवेदन देण्यात आले.

समाजात बाल अत्याचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे .पोलिसाचा आरोपीवर धाक राहिलेला नाही,त्यामुळे मनुष्याच्या जन्माला येऊनही जनावरांसम वर्तन करून घृणास्पद बाल अत्याचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसून येत आहे .अशा नराधमांना आद्दल घडवण्यासाठी शासनाने आरोपीस कठोर शिक्षा दयावी जेणेकरून पुन्हा अशा प्रकारच्या गैरकृत्यांना करण्याची हिंमतच कोणाची होऊ नये .

झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी संवेदनशील मनाच्या व्यक्ती कडून शासनाला जाग आणि जाण आणण्याच्या उद्देशाने हे निवेदन देण्यात आले.

आज वेशीवर असणारे संकट उद्या आपल्या घरापर्यंत येऊन आपल्या कुटुंबाला अकल्पित परिस्थितीला तोंड द्यायला कशावरून लावणार नाही असा हादरवून टाकणारा विचार मुलींच्या पालकांची झोप उडवणारा ठरतो आहे. आगामी काळामध्ये पुन्हा अशा घटना घडू नयेत यासाठी सामाजिक स्तरावर सर्व समाज संघटना रस्त्यावर उतरून आपले सामाजिक उत्तरदायित्व पूर्णत्वाला नेणार आहेत. या निदर्शनासाठी जबाबदार नागरिकत्वाच्या भूमिकेतून बीडकरांनी हजारोंच्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकत्र येऊन मंगळवारी सकाळी ११ वाजता मा.जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देण्यात आले

## संघर्षातून यशाकडे ; भांडी-धुणी करणाऱ्या माऊलीच्या लेकीची 12 वीच्या परीक्षेत मोठी झेप!



तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ** | आईने दुसऱ्यांच्या घरी भांडी-धुणी करून काबाडकष्ट केले आणि मुलीनेही त्या कष्टाचे चीज करत १२ वीच्या परीक्षेत तब्बल ७८% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. परिस्थिती बेताची असली तरी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर मिळवलेल्या तनुजा रणदिवे या मुलीच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तनुजा ची आई पद्मिन तानाजी रणदिवे गेल्या अनेक वर्षांपासून गणेशपार भागात धुणी-भांडी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. पतीच्या निधनानंतर व आर्थिक स्थिती हलाखीची असताना घराची संपूर्ण जबाबदारी आईच्या खांद्यावर होती. "माझ्या वाट्याला आलेले कष्ट माझ्या मुलीच्या वाट्याला येऊ नयेत," याच एका ध्येयाने या माऊलीने दिवसरात्र काम केले. परळी येथे हनुमान नगर येथे किरायाच्या घरात राहणाऱ्या व घरात अभ्यासासाठी वेगळी खोली नाही की महागडे क्लास लावण्याची सोय नव्हती. आई कामावर गेल्यावर घरची कामे आटपून ही मुलगी अभ्यासाला बसायची. रात्री उशिरा पर्यंत तिने चिकाटीने अभ्यास केला. कष्टाचे मोल जाणणाऱ्या तनुजाने अभ्यासात कधीही कसर सोडली नाही.

नुकत्याच जाहीर झालेल्या १२ वीच्या निकालात तिने कला शाखेतून ७८% गुण मिळवून सर्वांनाच थक्क केले. निकालाचे वृत्त समजताच आईच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. "माझ्या मुलीने माझ्या कष्टाचं सोनं केलं," अशी भावना तिने व्यक्त केली.

तनुजा च्या यशानंतर आता तिला उच्च शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभे राहायचे आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळवलेले हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# भाजपाची तीन राज्यात सत्ता आल्याबद्दल माजलगाव भाजपाच्या वतीने विजय उत्सव साजरा




तभा. वृत्तसेवा

**माजलगाव** | पश्चिम बंगाल आसाम पाँडिचेरी या तीन राज्यात भाजपाची एकहाती सत्ता आल्याबद्दल माजलगाव भाजपाच्या वतीने जल्लोष करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक माजलगाव येथे आतिश बाजी करत भारतीय जनता पार्टीचा विजय असो वंदे मातरम भारत माता की जय देश का नेता कैसा हो नरेंद्र मोदी जैसा हो पंकजा मुंडे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है या घोषणाने विजय उत्सव साजरा केला यानंतर पेढे रसगुल्ले व झालमुडी खाऊन सर्व भाजप पदाधिकारी यांनी आनंद व्यक्त केला. ३७० कलम असो की राष्ट्रवाद डॉक्टर शामाप्रसाद मुखर्जी यांची दूरदृष्टी व विचारांचा मार्ग आज अभतपूर्व यश मिळवून देणारा ठरला. व पंतप्रधान मोदी यांनी २०४७ ची विकसित भारताची दिशा निश्चित केली . भयमुक्त बंगाल सुरक्षित बंगाल नारा हा सर्वसामान्य मतदारांनी स्वीकारला. कणखर गृहमंत्री अमित भाई शहा यांच्या राजकीय धोरणांचा हा विजय आहे व राज्याचे विकासासाठी नव्या अशा आणि संधी निर्माण करणारा आजचा विजय ठरेल. आसाम मध्ये व पॉडेचेरीमध्ये देखील सरकारच्या विकास विकासाभिमुख व नेतृत्व कार्यावर जनतेने पुन्हा विश्वास ठेवत नेतृत्व स्वीकारले. हा विजय उत्सव साजरा करताना भाजपाचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके भाजपा शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी रूपाली कचरे हनुमान कदम अभय होके कैलास खुरपे दत्ता महाजन शरद कचरे ईश्वर खुरपे रामेश्वर चव्हाण उमेश जाधव सुनील दळवी राम शिंदे प्रल्हाद दळवे नामदेव मुळे सुभाष कांबळे अभिजीत गिलानकर प्रल्हाद दळवे असेफ इनामदार सुनील कुलकर्णी यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# परळीत सोमवारी आणि शुक्रवारी दारूची दुकाने कडकडीत बंद ठेवा!

### काँग्रेस गटनेते सय्यद फारुख (बब्बू) यांची आक्रमक मागणी; नगरपालिकेत दिले निवेदन

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | परळी शहरातील सार्वजनिक शांतता, धार्मिक पावित्र्य आणि सर्वसामान्यांची सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी दर सोमवारी व शुक्रवारी दारू विक्री पूर्णपणे बंद ठेवावी, अशी आक्रमक मागणी काँग्रेसचे नगरपरिषदेतील गटनेते तथा नगरसेवक सय्यद फारुख गणी उर्फ बब्बू यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी आज नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले.

नगरपरिषद यांना दिलेल्या निवेदनात सय्यद फारुख यांनी म्हटले आहे की सोमवारी परळीत मोठा आठवडी बाजार भरतो. ग्रामीण भागातून हजारो नागरिक, महिला आणि शेतकरी आपल्या कुटुंबासह शहरात येतात. अशा वेळी दारूमुळे होणारे वादविवाद आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनतो. तसेच शुक्रवार हा दिवस मुस्लिम समुदायासाठी अत्यंत पवित्र मानला जातो. धार्मिक भावनांचा आदर करत आणि शहरात शांततापूर्ण वातावरण राहावे, यासाठी या दिवशी मद्यविक्री बंद असणे गरजेचे आहे. जर नगरपरिषदेने सोमवारी मांस विक्री बंद करण्याचा निर्णय घेतला असेल, तर त्याच धर्तीवर दारू विक्रीवर बंदी का घातली जाऊ शकत नाही?" असा थेट सवाल बब्बू यांनी प्रशासनाला विचारला आहे. दारूमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत आणि सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या त्रासामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त आहेत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

शहरातील कायदा व सुव्यवस्था तसेच धार्मिक वातावरण टिकवून ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. सोमवारी आणि शुक्रवारी मद्यविक्री बंद ठेवल्यास महिलांची सुरक्षितता वाढेल आणि तरुणांना व्यसनाधीनतेपासून रोखण्यास मदत होईल. प्रशासनाने यावर तत्काळ अंमलबजावणी करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असेही सय्यद फारुख गणी (बब्बू), गटनेते, काँग्रेस यांनी म्हटले आहे.

गुरुवार, ३० एप्रिल रोजी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत हे निवेदन सादर करण्यात आले. या सभेत मुख्याधिकारी आणि सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत या विषयावर जोरदार चर्चा झाली. आता प्रशासन या लोकहिताच्या मागणीवर काय निर्णय घेणार, याकडे संपूर्ण परळी शहराचे लक्ष लागले आहे.

## इरा पब्लिक स्कुल व ज्युनिअर कॉलेजची उज्वल यशाची परंपरा कायम

**गेवराई (प्रतिनिधी)** | फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून इरा पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज ने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. छत्रपती संभाजी नगर उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेतलेल्या बारावीच्या विद्यार्थ्यांचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे यामध्ये गेवराई शहरातील इरा पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज चा निकाल शंभर टक्के लागला आहे. या बारावी परीक्षेसाठी २४ विद्यार्थी बसले होते. हे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून या इरा पब्लिक स्कूल ने आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष गणेश क्षीरसागर, प्राचार्य वर्षा क्षीरसागर, अश्विनी कुलकर्णी, संचालक श्रीनिवास क्षीरसागर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## मुकुंद पुजा साहित्य भांडार येथे नव्याने सुरु झालेल्या भारतीय डाक सेवा केंद्र टपाल बुकींगला नागरीकांचा उत्तम प्रतिसाद

परळी वैद्यनाथ दि.(प्रतिनिधी) भारतीय डाक विभागाने नव्याने सुरू केलेल्या भारतीय डाक सेवा केंद्र. परळी येथील प्रसिद्ध असलेले मुकुंद पूजा विधी साहित्य भांडार येथे नुकतेच सुरू करण्यात आले आहे. या ग्राहक डाक सेवा केंद्राच्या पहिल्या दिवशी परळी येथील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. पहिल्याच दिवशी 108 टपाल बुकिंग करण्यात आली. भारतीय डाक विभागाने पहिल्यांदाच अशा ग्राहक सेवा केंद्राला मान्यता दिली असून, मराठवाड्यातील परळी वैजनाथ येथील मुकुंद पूजा साहित्य भांडार येथे संचालक मुकुंद गोपाळ आंधळे यांना या केंद्राची मान्यता देण्यात आली आहे. सोमवार दि.२७ एप्रिल रोजी मोहिनी एकादशीच्या शुभ मुहूर्तावर या टपाल बुकिंग सेवेचा शुभारंभ करण्यात आला. यास परळी येथील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे.

## अल्पवयीन मुलीची हॉटेलमध्ये छेडछाड व विनयभंग केल्याप्रकरणी आरोपीस पाच वर्ष कारावासाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल

तभा. वृत्तसेवा

**बीड .प्रतिनिधी** | अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी बीड येथील रहिवाशी असलेला आरोपी शेख युनुस शेख लाल यास मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषी ठरवत चार वर्ष सश्रम करावास व.१०,०००/ रूपये दंड व दंडन भरल्यास १ वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

या प्रकरणी सविस्तर माहिती अशी की, दि. १९ मार्च २०२३ रोजी सकाळी ०७ ०० वाजता अल्पवयीन मुलगी गल्लीतील शेख युनूस याच्या हॉटेलमध्ये दूध आणन्यासाठी गेली होती. चहाचे हॉटेल समोर उभी असतांना युनुस याने अल्पवयीन मुलीस हॉटेलमध्ये बोलावले परंतु पीडिटेने आतमध्ये जाण्यास नकार दिला असता आरोपीने हाताना धरून हॉटेलमध्ये ओढले व गळयास मिठी मारली. पीडित मुलगी मोठयाने ओरडल्याने सयद शहानवाज इकबाल हे तेथे आले व त्यांनी आरोपी युनूस यास तु क्या कर रहा है तेरे बच्चीकी उमरकी है असे म्हणन त्यास शिवीगाळ करून दोन चापटा मारल्या व मुलीची सुटका केली.

पिडीतेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन पेठ बीड येथे आरोपी विरूध्द कलम ३५अ भादवी आणि कलम ८, १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ प्रमाणे गऱ्गुन्हा नोंदवण्यात आला. सदरील फिर्यादीवरून तात्कालील सपोनि जी.एल .अंतरप यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे आरोपी विरूच्द दोपारोपपत्र दाखल केले होते.सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकण ०६ साक्षीदार तपासण्यात आले. सदर प्रकरणातील फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फितूर झाले असतांना सदर प्रकरणात केवळ पिडीता. वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी व इतर साक्षीदार यांचा साक्ष व सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. सुरेश एस.घोरपडे यांनी आरोपीस कलम ३५-अभादवी आणि कलम ८. १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ अन्वये यांनी दोषी ठखून ५ वर्ष सश्रम करावास व १०,०००/ रूपये दंड व दंड न भरल्यास १ वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

सदर प्रकरणात पीडितेच्या वतीने सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## तुळजाभवानीला सव्वा दोन किलोची चांदीची तलवार-ढाल अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ मे -**

हैदराबाद येथील श्री तुळजाभवानी देवींच्या भाविका पटोला सबिथा इंद्रा रेड्डी यांनी दि. ५ मे रोजी श्री तुळजाभवानी देवीला सव्वा दोन किलो वजनाची चांदीची तलवार व ढाल अर्पण करून आपली भक्ती व्यक्त केली.



रेड्डी या देवीच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आल्या होत्या. यावेळी त्यांनी सुमारे सव्वा दोन किलो वजनाची चांदीची तलवार आणि ढाल अर्पण करून देवीप्रती आपली निष्ठा आणि श्रद्धा व्यक्त केली.

मंदिर संस्थानच्या वतीने त्यांच्या या भाविकतेचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थानचे कर्मचारी विकास वाणी व महेश गंजे उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### भाजपच्या विजयाचा जल्लोष

**नळदुर्ग, दि.५ मे -**

देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत पश्चिम बंगाल, आसाम व पडुचेरी येथे मिळालेल्या यशाबद्दल नळदुर्ग शहरात भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. भाजप कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या हस्ते श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर कार्यकर्त्यांनी पेढे वाटप, गुलाल उधळण व फटाक्यांची आतषबाजी करत आनंद व्यक्त केला. याप्रसंगी दत्तात्रय दासकर, तानाजी जाधव, शशिकांत पुदाले, सिद्धेश्वर कोरे, प्रविण गायकवाड, शिवाजी गायकवाड, श्रमिक पोतदार, पद्माकर घोडके, धिमाजी घुगे, किशोर नळदुर्गकर, संजय विठ्ठल जाधव, स्वप्नील काळे, सागर हजारे, धनाजी गायकवाड, बबन चौधरी, अक्षय भोई, संदीप गायकवाड यांच्यासह भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.



### अध्यक्षपदी अशोक हुकीरे

**इटकळ, दि.५ मे -**

तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी अशोक लक्ष्मण हुकीरे, तर उपाध्यक्षपदी अशोक महाबोले यांची निवड करण्यात आली. २ मे रोजी सेक्रेटरी शशिकांत हांडगे यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रिया पार पडली. या सोसायटीअंतर्गत केशेगाव व देवसिंगा परिसरातील शेकडो शेतकरी सभासद असून पिक कर्ज, शेती योजना व विविध आर्थिक सहाय्याचे काम या माध्यमातून केले जाते. यापूर्वी माजी अध्यक्ष निशा बिराजदार व उपाध्यक्ष इस्माईल फकीर यांनी कारभार पाहिला होता. निवड प्रक्रियावेळी मल्लीनाथ महाबोले, नागनाथ पाटू, प्रदीप हुकीरे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



### सुधाकर महाराज इंगळे यांची निवड

**धाराशिव, दि.५ मे -**

धाराशिव येथे झालेल्या बैठकीत वारकरी शिक्षण संस्था चालक संघाच्या अध्यक्षपदी हभप सुधाकर महाराज इंगळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शिंगोली सर्किट हाऊस येथे पार पडलेल्या या बैठकीत धाराशिव, बार्शी व सोलापूर भागातील संस्थाचालक सहभागी झाले होते. बैठकीत वारकरी शिक्षण संस्थांना एकत्रित करून शासनाकडून अधिक मदत मिळवण्यावर भर देण्यात आला. तसेच आचारसंहिता पाळणे, कीर्तन-प्रवचनासाठी अभ्यासक्रम तयार करणे व सहा वर्षांची नियमावली निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. विभागनिहाय प्रमुख नेमण्यावरही एकमत झाले.

### नळदुर्गमध्ये जुगार विरोधी कारवाई

**धाराशिव, दि.५ मे -**

नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या पथकाने ३ मे रोजी जुगार विरोधी कारवाईत इटकळ परिसरात छापे टाकून दोघांविरुद्ध गुन्हे नोंदवले. या कारवाईत सिद्धेश्वर भिमाशंकर हानुरे (रा. इटकळ) व सय्यद मंजूर सौदागर (रा. निलेगाव) यांच्याकडून प्रत्येकी १,१०० रुपयांसह 'श्री देवी मटका' जुगार साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



# देशभरातील यशासह पोटनिवडणुकांत विक्रमी विजय; कार्यकर्त्यांत नवचैतन्य

## भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचे प्रतिपादन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

देशातील विधानसभा निवडणुकांचे तसेच महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पोटनिवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात आला आहे. यासंदर्भात भाजपचे धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रतिक्रिया नोंदवली.

पश्चिम बंगाल, पुदुच्चेरी आणि असम या राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेले यश हे विकासाभिमुख धोरणांवरील जनतेच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे कुलकर्णी यांनी नमूद केले.

सुशासन, पायाभूत सुविधा विकास, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी संधी तसेच शेतकरी हिताच्या योजनांना मतदारांनी दिलेला पाठिंबा या निकालांतून स्पष्ट होत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी विजय मिळवला असून, बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत महायुतीच्या नेत्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी २ लाख १८ हजार ९३० मतांच्या विक्रमी फरकाने विजय संपादन केला आहे.

हा निकाल लोकशाही प्रक्रियेत जनतेच्या सक्रिय सहभागाचे द्योतक असल्याचे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

देशातील विविध राज्यांतील निकाल आणि महाराष्ट्रातील पोटनिवडणुकीतील यशामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून धाराशिव जिल्ह्यात संघटनात्मक काम अधिक वेगाने राबविले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्थानिक पातळीवर जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.



यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हा प्रभारी डॉ. अर्चनाताई चाकूरकर, शरण पाटील, अनिल काळे, नेताजी पाटील, सतीश दंडनाईक, विक्रमसिंह देशमुख, नितीन भोसले, प्रदीप शिंदे, साहेबराव घुगे, गणेश खरसडे, अस्मिता कांबळे, दिलीप भालेराव, प्रकाश आष्टे, संतोष बोबडे, प्रीती कदम, डॉ. सरोजिनी राऊत, विजय शिंगाडे, सिद्धेश्वर कोरे यांच्यासह सर्व मंडल अध्यक्ष, मोर्चा अध्यक्ष, आघाडी व प्रकोष्ठ संयोजक, जिल्हा व मंडल पदाधिकारी, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांच्या भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखेर तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाच्या ताब्यात

## मंत्रिमंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय; ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी दिलासा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

मुंबई येथील मंत्रालयात आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानमार्फत चालविण्यात येणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या या निर्णयावर आज अधिकृत शिक्कामोर्तब झाले.

गेल्या काही दिवसांपासून या हस्तांतरणाबाबत चर्चा सुरू होती. अखेर मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर या प्रक्रियेला अंतिम रूप मिळाले असून, महाविद्यालयाच्या सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे महाविद्यालयात आधुनिक पायाभूत सुविधा, अद्ययावत प्रयोगशाळा, गुणवत्तापूर्ण अध्यापन व्यवस्था आणि नवीन शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध होणार आहे. शासनाच्या ताब्यात गेल्यानंतर निधी उपलब्धता वाढणार असल्याने संस्थेच्या सर्वांगीण विकासाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. विशेषतः तुळजापूर व परिसरातील ग्रामीण आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरणार आहे. कमी खर्चात दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षणाची संधी उपलब्ध होऊन तांत्रिक शिक्षणाच्या नव्या वाटा खुल्या होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, स्थानिक पातळीवर या निर्णयाचे स्वागत करण्यात येत असून, शिक्षण क्षेत्रातील जाणकारांनीही याला सकारात्मक पाऊल असल्याचे म्हटले आहे.

## 'प्रत्येक थेंब अमूल्य'; जलतारा प्रकल्प ठरतोय पाणीटंचाईवर प्रभावी उपाय...

# जिल्ह्यात जलसंवर्धनाच्या चळवळीला वेग; लोकसहभाग निर्णायक

**विपीन वीर**
**धाराशिव, दि.५ मे -**

वाढती लोकसंख्या, हवामान बदल आणि पाण्याचा वाढता अपव्यय यामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाई गंभीर बनली आहे. दुष्काळग्रस्त धाराशिव जिल्ह्यात ही समस्या अधिक तीव्र असून, यावर मात करण्यासाठी जलतारा प्रकल्प हा प्रभावी उपाय म्हणून पुढे येत आहे. यासाठी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जलतारा खड्डे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मोफत खणून देण्यात येणार आहेत.

जलतारा म्हणजे पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची संकल्पना. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश पाण्याचे संवर्धन, साठवण आणि शाश्वत व्यवस्थापन करून भविष्यातील पाण्याची गरज भागवणे हा आहे. ग्रामीण भागातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून असल्याने अनियमित पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसतो. त्यामुळे पावसाचे पाणी साठवणे आणि भूजल पातळी वाढवणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. या प्रकल्पांतर्गत विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. त्यामध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रणाली उभारणे, लहान-मोठे बंधारे बांधणे, शेततळी तयार करणे, नाल्यांचे खोलीकरण तसेच विहिरींचे पुनर्भरण (रिचार्ज) करणे यांचा समावेश आहे. या उपायांमुळे पाण्याचा साठा वाढून भूजल पातळी सुधारण्यास मदत होत आहे. जलतारा प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना वर्षभर पाणी उपलब्ध होण्याची शक्यता वाढली असून, शेती उत्पादनातही वाढ होत आहे. परिणामी ग्रामीण भागातील आर्थिक स्थितीत सुधारणा होत आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होऊन गावांमध्ये हरित वातावरण निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे.

तथापि, या प्रकल्पाच्या यशासाठी केवळ शासनाचे प्रयत्न पुरेसे नसून लोकसहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळणे, पावसाचे पाणी साठवणे आणि जलसंवर्धनाबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. जलतारा प्रकल्प हा भविष्यातील पाणी संकटावर मात करण्याचा प्रभावी मार्ग ठरणार आहे.

### जलतारा प्रकल्प म्हणजे काय?...

जलतारा या शब्दाचा अर्थच पाण्याचा थेंब असा आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, साठवणे आणि योग्य पद्धतीने वापरणे. हा प्रकल्प पाणी संवर्धनावर आधारित असून, भविष्यातील पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो.

### शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी लाभ...

जलतारा प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना वर्षभर पाणी उपलब्ध होण्यास मदत होते. त्यामुळे शेती उत्पादनात वाढ होते आणि आर्थिक स्थिती सुधारते. तसेच पिण्याच्या पाण्याची समस्या कमी होते. गावांमध्ये हरित वातावरण निर्माण होऊन पर्यावरण संतुलन राखले जाते.



# १०० कोटींचा पीक विमा रखडला; शेतकऱ्यांचा धरणे आंदोलन

## पैसे न मिळाल्यास १४ मे रोजी रस्ता रोको...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

प्रलंबित पीक विमा २०२० व २०२५ संदर्भात धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले असून, लवकरात लवकर विमा रक्कम वितरित करण्याची मागणी करण्यात आली.

खरीप २०२० मधील सुमारे १३४ कोटी रुपयांची रक्कम कोणतीही स्थगिती नसताना राज्य शासनाकडून रोखून ठेवण्यात आल्याचा आरोप आंदोलकांनी केला. उच्च न्यायालयाचा आदेश असूनही अद्यापपर्यंत ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली नाही, असे त्यांनी सांगितले. तसेच खरीप २०२५ मध्ये पीक विमा कंपनीकडून ५०४ पीक कापणी प्रयोग घेण्यात आले होते. त्यापैकी २१७ प्रयोगांवर आक्षेप नोंदवण्यात आले, ज्यामधील २०० आक्षेप फेटाळण्यात आले आहेत. उर्वरित १७ प्रयोगांबाबत विमा कंपनीने राज्यस्तरीय समितीकडे याचिका दाखल केली असून ती बाब विचाराधीन असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, कोणतीही स्थगिती नसताना शेतकऱ्यांना हक्काच्या विमा रकमेपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करण्यात आला. जिल्ह्यातील शेतकऱ्यांची जवळपास ६०० कोटी रुपयांची रक्कम प्रलंबित असल्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. दरम्यान, १३ मेपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विम्याची रक्कम जमा न झाल्यास १४ मे रोजी उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जगताप यांनी दिला.

# ढोकीत धाडसी घरफोडी; २.४३ लाखांचा ऐवज लंपास



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

ढोकी येथील काढी गल्ली परिसरात पहाटेच्या सुमारास घरफोडीची घटना घडून २ लाख ४३ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मन्नान हमीदखाॅ पठाण (रा. काढी गल्ली, ढोकी) हे दि.४ मे रोजी पहाटे २.३० ते ५.३० वाजण्याच्या दरम्यान घराचा दरवाजा उघडा ठेवून झोपले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून रोख रक्कम १ लाख २५ हजार रुपये तसेच सोन्याचे दागिने असा एकूण २ लाख ४३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या घटनेप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## 'दैनिक तरुण भारत'च्या बातमीचा प्रभाव; २४ तासांत प्रशासन जागे!

# उमरगा उड्डाणपूल पुन्हा उजळला; अंधाराचा 'मृत्यूचा सापळा' अखेर हटला

**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.५ मे -**

सोलापूर-हैदराबाद या अत्यंत वर्दळीच्या महामार्गावरील उमरगा चौरस्ता येथील उड्डाणपूल अंधारात बुडाल्याची गंभीर बाब 'दैनिक तरुण भारत'मध्ये ३ मे रोजी ठळकपणे प्रसिद्ध होताच प्रशासनाची अक्षरशः धावपळ सुरू झाली. विशेष म्हणजे, बातमी प्रकाशित झाल्यानंतर अवघ्या २४ तासांत म्हणजेच ४ मे रोजी पुलावरील बंद पडलेले पथदिवे पुन्हा सुरू करण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून या उड्डाणपुलावर अत्यंत धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती. पुलाच्या एका बाजूला पथदिवे सुरू असताना दुसऱ्या बाजूला पूर्ण अंधार असल्याने वाहनचालकांना अचानक प्रकाशातून अंधारात प्रवेश करावा लागत होता. या असमतोल प्रकाशामुळे दृष्टीवर ताण येऊन अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला होता. दररोज हजारो वाहनांची वर्दळ असलेल्या या पुलावर अशी परिस्थिती अत्यंत चिंताजनक ठरत होती. विशेषतः रात्रीच्या वेळी दुचाकीस्वार, प्रवासी बस आणि जड वाहन चालकांसाठी हा अंधार अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' ठरत असल्याची भीती व्यक्त केली जात होती. अचानक अंधारामुळे वाहनांवरील नियंत्रण सुटण्याची शक्यता वाढून प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



ही बाब 'दैनिक तरुण भारत'मध्ये प्रसिद्ध होताच नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. बातमीमुळे संबंधित यंत्रणा तातडीने सक्रिय झाली आणि बंद पडलेले पथदिवे दुरुस्त करण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले.

परिणामी, ४ मे रोजी संपूर्ण उड्डाणपुलावरील पथदिवे पुन्हा सुरू करण्यात आले असून, सध्या पुलावर सर्वत्र प्रकाश व्यवस्था सुरळीत सुरू आहे. रात्रीच्या वेळीही उजेडामुळे वाहतूक अधिक सुरक्षित झाली आहे. अचानक अंधाराचा धोका टळल्याने वाहनचालक व प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या घडामोडींमुळे माध्यमांच्या प्रभावी हस्तक्षेपाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

गंभीर प्रश्नाला वाचा फुटताच तातडीने कार्यवाही होऊन समस्या मार्गी लागल्याचे चित्र उमरगा येथे पाहायला मिळाले. तथापि, भविष्यात अशी अंधाराची वेळ पुन्हा येऊ नये, यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## धाराशिवात मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवणाऱ्यावर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**



शहरातील देशपांडे स्टँड परिसरात मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालवणाऱ्या युवकावर पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आदित्य रामेश्वर तोडकरी (वय २४, रा. उपळा मा., ता. जि. धाराशिव) यांनी दि. ४ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे १.१५ वाजता एमएच २५ ई ४११ क्रमांकाची मोटरसायकल देशपांडे स्टँड येथील अंबिका पेट्रोल पंपाजवळ मद्यधुंद अवस्थेत चालवली.

यामुळे मोटार वाहन कायद्यातील कलम १८५ चे उल्लंघन झाल्याने पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सरकारतर्फे प्रथम खबर नोंदवून संबंधित युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# कार्यसंस्कृती, जबाबदारी आणि नातेसंबंध जपल्यासच राष्ट्र सामर्थ्यशाली होईल : डॉ. विठ्ठलराव लहाने

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ५ मे -**

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात समृद्ध संस्कृतींपैकी एक असून प्रत्येक नागरिकाने आपल्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन केले, कार्यसंस्कृतीची जोपासना केली आणि समाजाबद्दल जबाबदारीची जाणीव ठेवली, तर भारताला विकसित राष्ट्र होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही, असे प्रेरणादायी प्रतिपादन जागतिक कीर्तीचे प्लास्टिक सर्जन व प्रख्यात वक्ते डॉ. विठ्ठलराव लहाने यांनी केले.



कै. नारायणराव चिद्रावार स्मृती व्याख्यानमालेत ४०वे पुष्प गुंफताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार होते. व्यासपीठावर आमदार धनपाल सूर्यनारायण गुप्ता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक तथा माजी उपमुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव बालाजीराव पाटील खतगावकर, नगराध्यक्ष प्रतिनिधी बालाजी टेकाळे व संयोजक डॉ. किरण चिद्रावार उपस्थित होते.

प्रारंभी प्रा. सोमनाथ पवार व प्रकाश सोनकांबळे यांच्या स्वागत गीताने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कै. नारायणराव चिद्रावार यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करून व्याख्यानमालेस प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकपर भाषणातून किरण चिद्रावार यांनी कै.नारायणराव चिद्रावार यांच्या जीवन काळातील विविध क्षेत्रातील विकास कामाचा आढावा घेतला. त्यात अडत व्यापारी शिक्षण संस्थेची व देगलूर महाविद्यालयाची स्थापना करून गरीब शेतकरी व शेतमजुरांच्या मुलामुलींसाठी उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. नगरेश्वर मंदिर , राघवेंद्र स्वामी मंदिर स्थापन केल्याचा उल्लेख केला. अल्पसंख्यांक लोकांसाठी मौलाना आझाद उर्दू हायस्कूल स्थापन केले. त्यांच्या काळात नगर परिषदेमार्फत केलेले विकास कामाची माहिती दिली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले बालाजी पाटील खतगावकर यांनी देगलूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी म्हणून त्यांनी अनुभवलेल्या आणि विकास कामाचा देखील सविस्तर उल्लेख केला. देगलूर शहर व येथिल परिसराच्या सर्वांगीण विकसात चिद्रावार परिवाराच्या योगदानाचा गौरवाने उल्लेख केला. निजामबादचे आमदार धनपाल सूर्यनारायण गुप्ता यांनी देखील चिद्रावार परिवार हा आदर्श परिवार असुन आमचे कौटुंबिक नातेसंबंध निर्माण झाले यासाठी मी स्वतःला भाग्यशाली समजतो असेही गौरवोद्गार काढले.

अध्यक्षीय समारोप करताना लक्ष्मीकांत पदमवार यानी कै नारायणराव चिद्रावार यांच्या जीवनवर प्रकाश टाकून त्यांचा समाजवादी वारसा व विविध समाज उपयोगी कामे करण्याची प्रेरणा मिळाली असे ते म्हणाले. तसेच कै. नारायणराव चिद्रावार यांची प्रेरणा घेऊन देगलूर शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. विठ्ठलराव लहाने यांनी आपल्या जीवनातील अनेक अनुभव प्रतिपादन करून जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर जबाबदारीचे तत्व, सातत्य , चांगली पात्रता निरीक्षणात्मक दृष्टी , सचोटी, निरीक्षण, स्वच्छता आणि शिस्त असणे महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.जोपर्यंत प्रत्येक व्यक्ती आपल्या कुटुंबामध्ये अधिक वेळ देणार नाही, कुटुंबात असलेले नातेसंबंध जपणार नाही तोपर्यंत त्याच्या जीवनात खरा आनंद मिळणार नाही असे प्रतिपादन केले.

**RECORD सूत्रातून डॉ. लहाने यांनी दिला यशाचा मुलमंत्र**

आपल्या प्रभावी भाषणात डॉ. लहाने यांनी ‘RECORD’ या पाच सूत्रांद्वारे जीवन यशस्वी करण्याचा मंत्र दिला. R - Responsibility (जबाबदारी), E - Eligibility (पात्रता), C - Consistency (सातत्य), O - Observation (निरीक्षण व सचोटी), R - Relationship (नातेसंबंध) आणि D - Discipline (शिस्त) या गुणांचा अंगीकार केल्यास व्यक्ती, समाज आणि राष्ट्र प्रगतीच्या मार्गावर वेगाने वाटचाल करू शकते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.बी. आर.कतुरवार यांनी केले तर आभार प्रा संग्राम पाटील यांनी मानले. कार्यक्रमास देगलूर शहरातील

प्रतिष्टीत नागरिक अ.व्या.शि.संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर , कोषाध्यक्ष विलास तोटावार, कार्यकारी मंडळ सदस्य सूर्यकांत नारलावार , देवेंद्र मोतेवार, रवींद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ मोहन खताळ, महेश पाटील, डॉ. भूमे, डॉ. संतोष चिंतलवार, अविनाश कोडगीरे, जेष्ठ पत्रकार अविनाश हासनाळकर, डॉ. रवींद्र चिद्रावार, उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार , उपप्राचार्य डॉ. व्ही जी शेरीकर, उपप्राचार्य एम. एम. पटेल, प्रकाश चिद्रावार, गिरीश चिद्रावार, गुरुराज चिद्रावार व वल्लभ चिद्रावार यांच्यासह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

## देगलूर महाविद्यालयाने केले नीट परिक्षा केद्रांचे योग्य नियोजन

**देगलूर** -नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) तर्फे वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आयोजित 'नीट' परीक्षा रविवारी शांततेत पार पडली. यंदा तालुका पातळीवर नीट चे केंद्र होते. विशेषकरून ग्रामीण भागातील तीन राज्याच्या सीमेलगत असलेल्या देगलूर महाविद्यालय केंद्र असल्याने विद्यार्थ्यांना जाणे सोपे गेले.



देगलूर महाविद्यालयाने योग्य नियोजन केल्याने परिक्षा सुरळीत पार पडली आहे. पेपर सोडवून केंद्राबाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांमध्ये तणावा ऐवजी काहीसा उत्साह आणि चेहऱ्यावर आनंद दिसत होता. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदाची नीट सोपी गेल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. एनटीए तर्फे रविवारी देशभर नीट परीक्षा पार पडली. देशभरातून जवळपास १६ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. एकूण ६७२ पैकी६५३ विद्यार्थ्यांनी देगलूर शहरातील देगलूर महाविद्यालय केंद्रांवर परीक्षा दिली.११ वाजल्यापासून १:३० वाजेपर्यंत केंद्रावर रिपोर्टिंगची वेळ देण्यात आली होती. त्यामुळे बाहेर गांवच्या विद्यार्थ्यांनी सकाळपासून केंद्रांवर गर्दी केली होती. कडक बंदोबस्तात विद्यार्थ्यांना अगदी साध्या कपड्यांमध्ये प्रवेश देण्यात आला. हॉलमध्ये प्रवेशापूर्वी कसून तपासणी करण्यात आली. त्यामुळे थोडी तारांबळही झाली,पण नियोजन योग्य झाले.यावेळी निरीक्षक म्हणून डॉ.दिपक वाघमारे व डॉ.रामेश्वर गोवले होते.देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र अधीक्षक डॉ.अनिल चिद्रावार सुपरवायझर म्हणून डॉ.व्हि.जी.शेरीकर आणि प्रा.संग्राम पाटील यांनी सुनियोजित कार्य पार पाडले आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून ही मोठे सहकार्य मिळाले. अ.व्या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार सचिव डॉ.कर्मवीर उनग्रतवार सहसचिव राजकुमार महाजन कोषाध्यक्ष विलासशेठ तोटावार कार्यकारिणी सदस्य सुर्यकांत नारलावार देवेंद्रशेठ मोतेवार ,गंगाधरराव जोशी रविंद्रअप्पा द्याडे चंद्रकांत नारलावार विजयकुमार उनग्रतवार गुरुराज चिद्रावार सर्व संचालक मंडळ परिक्षा सुरळीत पार पडण्यासाठी मार्गदर्शन करून लक्ष ठेवून होते. केंद्रांवर परीक्षा शांततेत पार पडली

## रुग्णांना फळवाटप करून वाढदिवस साजरा

**मुदखेड**-काँग्रेसचे नांदेड जिल्हा सहसचिव तथा मुदखेड येथील प्रतिष्ठित व्यक्तिमत्व गिरीष कोत्तावार यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त समाजाप्रती बांधिलकी जपत ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळवाटपाचा उपक्रम राबविला. या उपक्रमामुळे रुग्णांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सामान्यतः वाढदिवस साजरा करताना केक कापणे किंवा वैयक्तिक कार्यक्रमांना प्राधान्य दिले जाते. मात्र गिरीष कोत्तावार यांनी यापेक्षा वेगळा आदर्श समोर ठेवत सामाजिक कार्यातून वाढदिवस साजरा केला. ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना फळांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना दिलासा मिळाला. यावेळी गिरीष कोत्तावार यांनी समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची गरज अधोरेखित केली. वाढदिवस हा केवळ आनंदाचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी करण्याची संधी आहे, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर रेल्वे गेट परिसरातील महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित स्थळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना आदरांजली वाहिली. या कार्यक्रमाला ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. आशिष कदम, माजी उपाध्यक्ष करीम खाँन साब, जिल्हा सहसचिव सूर्यकांत चौदंते, शिवानंद देवके, माजी शहर प्रमुख अंकुश मामीडवार, अतिक अहमद, गंगाधर पाटील मगरे, रमेश बोडके, गौस भाई मुल्ला, मोहम्मद अनीस भाई, सुभाष चौदंते यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिनी डॉ.मधुकर राठोड यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात

**नायगाव** -नायगांव तालुक्यातील मरवाळी तांडा येथील माध्यमिक आश्रम शाळेच्या वतीने महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आश्रम शाळा संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा सरपंच डॉ. मधुकर राठोड यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रतन लक्ष्मण राठोड यांच्या हस्ते महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमांचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. या नंतर महाराष्ट्र दिन आणि डॉ. राठोड यांच्या वाढ दिवसाचा दुग्धशर्करा योग साधत शाळेच्या प्रांगणामध्ये अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला. या वेळी प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते शाल श्रीफळ पुष्पहार देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तद्नंतर संस्थेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुष्पहार व पुष्पगुच्छ अर्पण करून डॉ. राठोड यांना शुभेच्छा दिल्या. प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाला सेवानिवृत्त प्राचार्य किशन रतन राठोड,माजी प्राचार्य श्रीराम राठोड,पोलीस पाटील दशरथ राठोड, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका कुसुमताई राठोड, प्राचार्य पांडुरंग येवले, तसेच गोविंद आडे, हेमंत बावणे, सूर्यकांत जाधव, देविदास राठोड ,अजय राठोड यांच्यासह आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# २२० किलो मांस व ९ जिवंत जनावरे जप्त;मुदखेड पोलिसांची कारवाई



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ५ मे -**

मुदखेड पोलीस पथकाने अवैध गोवंश कत्तल करणाऱ्या चार आरोपींविरुद्ध मोठी कारवाई या कारवाईत तब्बल १ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून या कारवाईत गोवंशाचे मांस आणि जिवंत जनावरे हस्तगत करून चार आरोपींवर गुन्हे दाखल केली असल्याची माहीती मुदखेड पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांनी दिली आहे.

दि.२ मे रोजी सकाळी सुमारे ८ वाजताच्या दरम्यान गुप्त माहितीच्या आधारे मुदखेड शहरातील गुजरी चौक परिसरातील कुरेशी गल्ली मोहल्ला येथे मुदखेड पोलिसांनी छापा टाकला असता, या ठिकाणी काही इसम अवैधरित्या गोवंशाची कत्तल करून मांस विक्रीसाठी साठवून ठेवत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केली. या छाप्यात पोलिसांनी अंदाजे २२० किलो गोवंशाचे मांस तसेच ०९ जिवंत जनावरे जप्त केली आहे.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे एक लाख ६६ हजार रुपये इतकी आहे.तर यात वेगवेगळ्या प्रकारच्या गायी व कालवडी तसेच विक्रीसाठी तयार ठेवलेले मांस यांचा समावेश आहे. या प्रकरणी मोहम्मद नसीर मोहम्मद नजीर, जुनैद कुरेशी, इरफान कुरेशी आणि मोहम्मद गौस कुरेशी एकूण चार आरोपींविरुद्ध महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ तसेच संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरिक्षक धीरज चव्हाण, सपोनि बि.आर.कांबळे, उपोनि शिवाजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस आंमलदार तायवाडे, पोहेका झुंजारे, आडे, मधुरकर भिसे, सुरनर, रंजीत वानोळे, यासह इतर पोलिस कर्मचारी यांच्या संयुक्त पथकाने ही यशस्वी मोहीम राबवली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी आपल्या घरात व परिसरात गोवंशाची कत्तल करून मांस साठवून ठेवले होते. काही जनावरे जिवंत अवस्थेत बांधून ठेवलेली आढळली. याप्रकरणी पुढील तपास सुरू असून अशा प्रकारच्या अवैध कृत्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## बालाजी पाटील यांना सेवानिवृत्ती निरोप

**बाऱ्हाळी**-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बापशेटवाडी येथील मुख्याध्यापक तथा थोटवाडी येथील रहिवासी बालाजी शंकरराव पाटील यांना शिक्षण विभाग व गावकऱ्यांच्या वतीने सेवानिवृत्तीचा निरोप देण्यात आला.

बालाजी पाटील यांचा शिक्षण क्षेत्रात वयोमानुसार कार्यकाल पूर्ण झाल्यामुळे सोमवार दि. २७ एप्रिल रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बापशेटवाडी ता. मुखेड येथे सेवापुर्ती गौरव सोहळा कार्यक्रमातून निरोप देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील होते तर आमदार डॉ. तुषार राठोड, माजी जि. प. अध्यक्षा सौ. वैशालीताई चव्हाण, माजी सभापती स्वप्नील चव्हाण, जिल्हा कॉंग्रेस नेते रामदास पाटील सुमठाणकर, कॉंग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष राजन देशपांडे, मुखेड बाजार समितीचे माजी उपसभापती व्यंकटराव पाटील चांडोळकर, भाजपा जिल्हा सचिव चंद्रशेखर पाटील. भाजप ता. अध्यक्ष बालाजी पाटील सकनूरकर, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख व्ही. एस. पाटील, रामराव मस्कले, हणमंत वाडीकर, सरपंच कु. दीपिकाताई मंदेवाड, माजी सरपंच सौ. मीनाक्षीताई पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी बालाजी बनसोडे, उत्तम चव्हाण, केंद्रप्रमुख एस. एस. करेवाड आदी उपस्थित होते.

# पिक विम्यापासुन वंचित ठेवल्याने ठाकरे सेनेच तहसीलसमोर आंदोलन



**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ५ मे -**

गत वर्षी अतीवृष्टीत नुकसान झालेल्या पिकाचा खरीप हंगामातील पिक विमा भोकर तालुक्याला मंजूर झाला असून यात किनी मंडळाला वंचीत ठेवल्याने शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आंदोलन करत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले व सात दिवसांत पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न झाल्यास तिव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.भोकर तालुक्यातील पाच मंडळाला पिक विमा मंजूर झाला परंतु यातील किनी मंडळाला पिक विमा मिळाला नाही. पिक विमा खात्यावर जमा न झाल्याने शेतकऱ्यामध्ये प्रचंड रोष निर्माण झाला असल्याने दि.४ मे रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथून पिक विमा मिळालाच पाहिजे, शेतकऱ्यावरील अन्याय सहन करणार नाही.पिक विमा घेतल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही असे नारे देत तहसीलदार कार्यालयात पोहचले.येथे तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्याशी पिक विमा विषयी चर्चा केली.व शिवसेनेकडून निवेदन देण्यात आले.यावेळी तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी सात दिवसांच्या आत विमा मिळण्याचे आश्वासन दिले.या निवेदनावर शिवसेना जिल्हा उप-संघटक सुभाष नाईक किनीकर,माजी जि.प.सदस्य सुनील चव्हाण,तालुका संघटक नंदकुमार पा.कौठेकर,माजी तालुका प्रमुख तथा चेअरमन गंगाधर महादवाड,दिव्यांग सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण पा.कदम,दिव्यांग तालुका प्रमुख विठ्ठल देवड,उप तालुका प्रमुख मारोती पवार, सर्कल संघटक साईनाथ गादेपवार, सर्कल प्रमुख लक्ष्मण ईरलोड, ग्रा.पं. स. संतोष जाधव, सरपंच बालाजी वाघमारे, पांडुरंग गादेपवाड, जळबा गाडेवाड,केरबा सुंकळीकर, बाबुराव कासारवाड, अविनाश गमेवाड, पत्रकार दत्ता बोईनवाड सह असंख्य शिवसैनिक हजर होते.

# अंगणवाडीच्या दारात घाणीचा स्फोट, सरकारी विहिरीला कचऱ्याचा वेढा

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ५ मे -**

स्वच्छ गाव, सुंदर गावच्या घोषणा देणाऱ्या इस्लापूर ग्रामपंचायतीचा खरा चेहरा अंगणवाडी क्रमांक १ परिसरात उघडपणे समोर आला आहे. अंगणवाडीच्या दारातच घाणीचे साम्राज्य पसरले असून कचऱ्याचे ढीग, सडलेला कचरा, प्लास्टिक, साचलेले गटाराचे पाणी आणि असह्य दुर्गंधीमुळे परिसर अक्षरशः असह्य बनला आहे. हा केवळ घाणीचा प्रश्न नसून नागरिकांच्या आरोग्यावर थेट घाला घालणारा ‘मृत्यूचा सापळा’ तयार झाल्याची भीती व्यक्त होत आहे.



या सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या घाणीच्या विळख्यातच गावाला पाणीपुरवठा करणारी सरकारी विहीर आहे. ज्या विहिरीतून हजारो नागरिकांना पिण्याचे पाणी मिळते, तिच्याच शेजारी कचऱ्याचा ढीग साचलेला आहे. त्यामुळे पाणी दूषित होण्याचा धोका प्रचंड वाढला असून संपूर्ण गावासाठी मोठे आरोग्य संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पाणीच विष बनणार का? असा संतप्त सवाल आता ग्रामस्थ विचारत आहेत.

अंगणवाडी म्हणजे लहान मुलांचे सुरक्षित, स्वच्छ आणि निरोगी वातावरण असले पाहिजे. पण इस्लापूरमध्ये मात्र याच्या नेमक्या उलट चित्र दिसत आहे. निष्पाप मुलांना दररोज घाणीच्या विळख्यात बसावे लागत आहे. माशा, डास, दुर्गंधी आणि साचलेल्या पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड, गॅस्ट्रो यांसारख्या आजारांचा धोका डोळ्यासमोर उभा टाकला आहे. तरीही इस्लापूर ग्रामपंचायत प्रशासनाने जणू काही परिस्थितीकडे पाठ फिरवली आहे.

विशेष म्हणजे, या गंभीर समस्येबाबत पंधरा दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांमध्ये ठळक बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यानंतरही प्रशासनाने एकही पाऊल उचललेले नाही. स्थानिक नागरिकांनी वारंवार तोंडी सूचना दिल्या, तक्रारी केल्या, अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलापण सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले. बातमी झाली, तक्रारी झाल्या पण कारवाई शून्य! अशी संतप्त प्रतिक्रिया आता गावभर उमटत आहे.

इस्लापूर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा हा कारभार केवळ निष्काळजीपणा नसून थेट जबाबदारीपासून पळ काढण्याचा प्रकार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. स्वच्छ भारत अभियान, ग्रामस्वच्छता योजना यांसारख्या उपक्रमांचा फक्त कागदोपत्री देखावा केला जातो, पण प्रत्यक्षात परिस्थिती अत्यंत बिकट आहे. निधी येतो कुठे? खर्च होतो कुठे? हा प्रश्नही आता जोर धरत आहे.

अधिकाऱ्यांनी स्वतः या ठिकाणी येऊन काही वेळ उभं राहावं, मगच त्यांना परिस्थितीची जाणीव होईल, असे संतप्त नागरिक सांगतात. काहींनी तर थेट आरोप केला की, जोपर्यंत एखादी मोठी दुर्घटना होत नाही, तोपर्यंत प्रशासन हालणार नाही.

पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताजवळ कचरा साचणे ही अत्यंत गंभीर बाब असून यामुळे पाणीजन्य आजारांचा धोका वाढतो. जर या विहिरीचे पाणी दूषित झाले, तर त्याचा फटका संपूर्ण गावाला बसणार आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाची निष्क्रियता ही गंभीर दुर्लक्षाची बाब ठरत आहे.

दरम्यान, संतप्त ग्रामस्थांनी आता अंतिम इशारा दिला आहेतात्काळ संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात यावी, जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, अन्यथा ग्रामस्थ रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील. परिस्थिती हाताबाहेर गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावरच राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

## महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**नांदेड** - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त आज उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला. यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या शुभहस्ते प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देण्यात आली.

या प्रसंगी प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, मानव्य विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग खडके, आंतरविद्याशाखीय अभ्यास मंडळाचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महसूल विभागाचा उपक्रम ठरला यशस्वी समाधान शिबिरातून नागरिकांना दिलासा

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ५ मे -**

महसूल विभागाच्या सेवा थेट नागरिकांच्या दारी पोहोचवून प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या ‘समाधान शिबिरा’ला नरसी मंडळ परिसरातील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. छत्रपती शिवाजी महाराज अभियानांतर्गत हे शिबिर नरसी येथे पार पडले.



या शिबिराला नायगाव मतदारसंघाचे आमदार राजेश पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच तहसीलदार डॉ. धम्मप्रिया गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी नायब तहसीलदार विजय येरावाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत पटवेकर, कृषी अधिकारी दिपेश देवरे, मंडळ अधिकारी शितल स्वामी, सचिन आरु, ग्रामपंचायत अधिकारी नागेश यरसनवार, ग्राम महसूल अधिकारी शाम मुंडे, पोलीस पाटील इब्राहीम बेग पटेल, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष गंगाधर वडगावे आदी उपस्थित होते.

शिबिरात विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत आरोग्य विमा लाभ, सिद्धपत्रिका, जातीचे प्रमाणपत्र, सातबारा उतारा आदी आवश्यक कागदपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच संबंधित विषयांवर नागरिकांना सविस्तर मार्गदर्शनही करण्यात आले. महिला व बाल विकास प्रकल्पांतर्गत लाभार्थींना ‘बेबी किट’चे वाटप करण्यात आले. यावेळी नागरिकांच्या विविध समस्यांबाबत अर्ज स्वीकारण्यात आले असून, त्या तातडीने निकाली काढण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. गावपातळीवरच प्रशासकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

शिबिराच्या यशस्वितेसाठी ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे तालुका अध्यक्ष श्याम मुंडे, एस. एम. कोणाळे, पंजाबराव मोरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार गंगाधर गंगासागरे यांनी केले.

या शिबिराला नरसी, मुगाव, कुंचेली, धानोरा, टाकळी, शेळगाव (गौरी), धुप्पा आदी गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे शासनसेवा अधिक सुलभ व परिणामकारक होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था,विष्णुपूरी,नांदेड-431606
उत्कृष्ट तंत्रज्ञानार्थम् जनशक्तं शिक्षणम्

**उपहारगृह चालविण्या बाबत निविदा सूचना**

प्रस्तुत संस्थेच्या परिसरातील उपहारगृह चालविण्यासाठी नोंदणीकृत उपहारगृह चालकांनी प्रत्यक्ष मुलाखतीसाठी **दि.14/05/2026** रोजी सकाळी ठीक 11.30 वाजता खालील कागद पत्राच्या मूळ प्रतिसह संस्थेत स्थळनिर्माण विभागात उपस्थित राहावे.

01. शॉपॲक्टनुसार नोंदणी प्रमाणपत्र
02. अन्न व भेसळ अधिनियम अंतर्गत प्रमाणपत्र
03. पॅनकार्ड/जीएसटी प्रमाणपत्र जर उपलब्ध असेल तर
04. अनुभवाचे प्रमाणपत्र.
05. मुलाखतीत भाग घेण्यासाठी रू.1000/- (ना परतावा) संस्थेच्या खात्यात जमा करून त्याची पावती सोबत आणावी. (www.sbi.collect)
06. कोणताही अर्ज स्वीकारण्याचा अथवा रद्द करण्याचा किंवा सर्व अर्ज रद्द करण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे.

**नोट : बार परवानाधारकांना निविदा प्रकियेत भाग घेता येणार नाही.** संस्थेतील उपहारगृह चालविण्यासाठी संस्थेचे अटी व नियम संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध असतील. (www.sggs.ac.in)

संचालक

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भाजपच्या विजयाचा हिंगोलीत कार्यकर्त्यांकडून झालमुरी आणि रसगुल्ले वाटून जल्लोष

## आ. मुटकुळे, घुगे यांची उपस्थिती फटाक्यांची आतिषबाजी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**

देशातील पाच राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये भारतीय जनता पक्षाने पश्चिम बंगाल, पाँडेचरी आणि आसाममध्ये घवघवीत यश मिळवले असून, पुडुचेरी मध्येही मित्र पक्षासह जोरदार कामगिरी केली आहे.भाजपाला मिळालेल्या या यशाचा हिंगोलीत आमदार तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे,माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर,फुलाजीराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपाने जल्लोष साजरा केला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या या विजया नंतर शहरातील गांधीचौक येथे भाजपाच्या प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र जमून विजयाच्या घोषणा दिल्या यावेळी ढोल ताश्याचा गजरात फटाके फोडून आणि झालमुरी आणि रसगुल्ला मिठाई वाटून आनंद साजरा करण्यात आला.हा विजय जनतेचा भाजपवरील विश्वासाचे प्रतीक आहे. आसाममध्ये पुन्हा एकदा भाजपने आपली पकड मजबूत केली आहे, तर पश्चिम बंगालमध्येही पक्षाने अभूतपूर्व मुसंडी मारली आहे, असे मत यावेळी भाजपा नेत्यांनी व्यक्त केले.

यावेळी विरकुंवर अण्णा, के.के शिंदे, जिल्हा सरचिटणिस उमेश नागरे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, अंकुश आहेर, गोल्डी सोनी, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, कृष्णा रुहाटिया, मिरा सुर्यवंशी, नगरसेवक उमेश गुठ्ठे, हमीद प्यारेवाले, अजय गायकवाड, लखन कुरील, अमित रुहाटिया, मनोज शर्मा, संजय ढोके, बाबाराव घुगे, माणिक लोढे, सुनिल भुक्तर, रमेश करहाळे, रमेश पाटील जाधव, उत्तमराव जगताप, विश्वास बांगर, सचिन शिंदे, कैलाश श्रीनाथ, संदीप वाकडे, नितीन राठौर, राजेंद्र हलवाई, समिर भिसे, महेश शहाणे, अशिष शर्मा, संजय खंडेलवाल, अंकुश जैस्वार, गुड्डू देवकते, सुमंत नायक, योगेश घन, जय घोडे, चांदु लांडगे, आनंद सातपुते यांच्यासह या जल्लोषात भाजपचे जिल्हा स्तरावरील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

# मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांना कर्मयोगी पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**

केंद्र शासनाच्या मिशन कर्मयोगी उपक्रमांतर्गत साधना सप्ताहामध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांना पुरस्कार जाहीर झाला असून मुंबई येथे दि ८ मे शुक्रवारी एका कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाने मिशन कर्मयोगी उपक्रम देशभरात हाती घेतला आहे. या उपक्रमांमध्ये विविध प्रशिक्षण, अभ्यासक्रमासह इतर उपक्रम जिल्हा परिषद व इतर शासकीय कार्यालयांनी राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या अभियानांतर्गत केंद्राच्या सूचनेनुसार दि २ ते ८ एप्रिल या कालावधीत साधना सप्ताह राबविण्यात आला. या सप्ताहात जिल्हा परिषद अंतर्गत कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून एआयच्या प्रशिक्षणसोबतच इतर चार तासांचे प्रशिक्षण पूर्ण करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृध्दी दिवाने, केशव गड्डापोड, विजय बोराटे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे, कार्यकारी अभियंता प्रियंका राजपूत, समाज कल्याण अधिकारी गीता गुठ्ठे, शिक्षणाधिकारी आसावरी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच विभागामधून सुमारे ५०९८ कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. त्यापैकी ५०२२ कर्मचाऱ्यांनी चार तासांचा कोर्स पूर्ण केला. त्यामुळे राज्यात इतर जिल्ह्याच्या तुलनेत हिंगोली जिल्हा परिषदेच्या ९५ टक्के कर्मचाऱ्यांनी कोर्सेस पूर्ण करून राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. या प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांच्या कामकाजात सुधारणा येणार असून कामात गतीमानता व अचूक कामे होतील. त्यामुळे प्रशासन गतीमान होऊन नागरिकांची कामे जलदगतीने होण्यात मदत होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांना शासनाच्या सामान्य प्रशासनाच्यावतीने पुरस्कार जाहीर झाला आहे. मुंबई येथे शुक्रवारी मंत्रालयाच्या मुख्य इमारतीच्या त्रिमुर्ती प्रांगणात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे पत्र अप्पर सचिव व्ही राधा यांनी पाठविले आहे.

# चुकून दुसऱ्याच्या फोन पे वर गेलेली रक्कम सायबर सेलच्या मदतीने मिळाली परत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**

डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक हिंगोली यांनी जेष्ठ नागरिक, महिला, मुले यांच्या तक्रारीबाबत सहानुभूतीपूर्वक व तात्काळ कार्यवाही करण्याबाबत नेहमीच सूचना देत असतात.

दि. ५ मे २०२६ रोजी हिंगोली येथील जेष्ठ विधीतज्ञ श्री रंभाजी हनुमंत शिंदे वय ८० वर्ष राहणार गणेश वाडी हिंगोली यांनी यात्रे संदर्भाने एकास रोख दहा हजार रुपये फोन पे द्वारे पाठवत असताना चुकून दुसऱ्याच फोन पे नंबर ला गेले होते अनेक प्रयत्न करून सुद्धा सदर पैसे समोरचा व्यक्ती वापस पाठवत नव्हता तेव्हा ज्येष्ठ वकिलांनी सदर प्रकारची तक्रार तात्काळ सायबर सेल हिंगोली येथे दिली असता सायबर सेलच्या मदतीने अवघ्या पाच मिनिटात सदर चुकून गेलेली रोख रक्कम परत करून दिली आहे. जेष्ठ नागरिकांनी हिंगोली पोलिसांचे आभार मानले. जेष्ठ नागरिक, महिला, मुले यांच्यासाठी हिंगोली पोलीस २४ तास प्राधान्याने काम करण्यास तत्पर आहे. नागरिकांनी कोणत्याही पोलीस मदतीसाठी ११२ वर निशुल्क कॉल करावा. पोलीस तात्काळ आपल्या मदतीसाठी तयार आहे.

# वादळी वाऱ्यासह पावसामुळे वीजेच्या तारा लोंबकळल्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**

शहरात मंगळवारी दुपारी दीड ते दोनच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्यामुळे आदर्श महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील वीजेच्या तारा लोंबकळल्या तर काही ठिकाणी तारा तुटून खाली पडल्या. यामध्ये कुठलीही जीवीत किंवा वित्तहानी झाली नाही.

मंगळवारी दुपारी अचानक वादळी वाऱ्यासह पावसाला शहरात सुरूवात झाली. या वादळी वाऱ्यामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे पहावयास मिळाले. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे मोंढा परिसरात शेतकऱ्यांनी विक्रीला आणलेली हळदही भिजली असून काही शेतकऱ्याचे नुकसान झाल्याचे समजते. अर्धा ते पाऊण तास वादळी वाऱ्यामुळे सर्वत्र जनजीवन विस्कळीत झाले होते.

# सिध्देश्वर तलावातील पाणी केळी तलावात उपसा करून टाका अन्यथा जलसमाधी घेऊ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**

सिद्धेश्वर तलावातील पाणी केळी तलावामध्ये उपसा करून टाका,या संदर्भाचे मंगळवारी(०५) मे रोजी दुपारी तीन वाजता शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. सदरील निवेदन तहसीलदार हरीश गाडे यांनी स्वीकारले आहे .

निवेदनात नमूद, केळी तलावातील पाण्यामुळे आमच्या गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटत असतो. परंतु या केळी तलावात पाण्याचा साठा फक्त डिसेंबर जानेवारीपर्यत राहतो. त्यामुळे आमच्या गावातील पिण्याच्या पाण्याचे सर्व सोर्स फेब्रुवारीपासून पावसाळा लागेपर्यंत कोरडे पडतात. त्यामुळे केळी तलावावर अवलंबून असणारे २० ते २५ गावं ओसाड होत आहेत. त्यामध्ये पार्डी ,सावळी खु. केळी, केळी तांडा, येळी, उंडेगाव, हिवरखेडा, रामेश्वर, दौडगाव, लांडाळा, उखळी, चिंचोली निळोबा, साळणा, अनखळी, गोजेगाव, जलालपूर, देवसडी, वाडी, आदि गावांमध्ये भिषण पाणीटंचाई होत असून नागरीकांना, जनावरांना व शेतीसाठी पाण्याअभावी वणवण भटकंती करावी लागत असते. त्यामुळे आमच्या गावातील पिण्याचा पाण्याचा गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी केळी तलावामध्ये पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

फेब्रुवारी ते पावसाळा चांगला होईपर्यंत सिद्धेश्वर तलावातील पाणी उपसा करून केळी तलावामध्ये टाकणे आवश्यक आहे. केळी तलावामध्ये पाणी टाकण्यासंबंधी तात्काळ योजना तयार करावी, जेणेकरून या तलावावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल व व या परिसरातील शेतकऱ्यांची शेती सिंचनाखाली येईल. या निवेदनाची तात्काळ दखल घेतली नाही तर मौजे गोळेगाव येथील कॅनॉलमध्ये ११ एप्रिल रोजी जलसमाधी घेणार असा इशारा देखील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या निवेदनावर एकनाथ शिवाजीराव नागरे , विठ्ठल सांगळे,गंगाराम आसाराम घुगे, अमोल प्रकाश सांगळे, विलास दादाराव आघाव, विठ्ठल रामप्रसाद सांगळे, बालाजी पूरभाजी सांगळे, संतोष नागोराव मोरगे, भास्कर जनार्धन आघाव, रामप्रसाद शिवाजी आघाव, नितीन उद्धवराव आघाव, सचिन सोपानराव आघाव, राणोजी मुकिंदा घुगे, राहुल मुंजाजी नागरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायाविरोधात मोहीम, १६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**

नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. तिसऱ्या दिवशी ७९ गुन्हे दाखल तर ११७ इसमांविरूध्द १६ लाख रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली, नांदेड तसेच लातूर पोलिस दलातील पथकांनी केली असून अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरूच राहणार असल्याचा इशारा उपमहानिरीक्षक उमाप यांनी दिला आहे.

सदर मोहिमेच्या तिसऱ्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात, गुटखा विक्री करणाऱ्या एका इसमाकडून रुपये १,०५,९८६/- रुपये किंमतीचा गुटखा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. सदर कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून त्यास दहा वर्षे पर्यंत कैद व द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

याचप्रमाणे, दिवसभरात मटका-जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण (३७) इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत (७) गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ७,११,८८०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर, अवैध दारू विक्री करणाऱ्या (६३) आरोपींविरुद्ध (६२) गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ५,०६,३००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासोबतच, शस्त्र अधिनियमान्वये (३), कोटपा अन्वये (५), तर इतर अधिनियमाखाली मिळून, एकूण (७९) कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून १६,३६,७३१/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उपरोक्त कारवाईत नांदेड परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर येथील अधिकारी व अंमलदारांनी भाग घेतला.

## संक्षिप्त वृत्त

### रामलीला मैदानावरील दसरा महोत्सव समितीच्या कार्यालयाला आग



हिंगोली- शहरातील रामलिला मैदानावरील दसरा महोत्सव समितीच्या कार्यालयात अचानक आग लागली. या आगीची माहीती मिळताच नगर परिषदेच्या अग्नीशमन दलाला पाचारण करण्यात आले. अथक परिश्रमानंतर आग विझवण्यात अग्नीशमन दलाच्या पथकाला यश आले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक मैदानावर जमा झाले होते. या कार्यालयात श्री हनुमान व इतर देवतांच्या मूर्ती होत्या. परंतु वेळीच अग्नीशमन दलाचे पथक दाखल झाल्यामुळे या मूर्ती सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले मात्र काही साहीत्य आगीत जळून खाक झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही.

### ७० वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- पोलिस विभागाने ७० वाहन चालकांविरूध्द कार्यवाही करीत ५५ हजार ५५० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले यांच्या चित्ररथाचे हिंगोलीत जल्लोषात स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ५ मे**

क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती महोत्सवाच्या निमित्ताने दि ५ मे रोजी हिंगोलीत चित्ररथाचे स्वागत करण्यात आले.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती महोत्सवाच्या निमित्ताने ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ या वर्षात केंद्र व राज्य सरकारच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानिमित्ताने अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदचे संस्थापक अध्यक्ष मंत्री छगनराव भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली, माजी खासदार समीर भुजबळ व आमदार पंकज भुजबळ यांच्या संकल्पनेतून महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित चित्ररथाची निर्मिती करण्यात आली आहे. महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने हा चित्ररथ महाराष्ट्रभर फिरविण्यात येत आहे.

या चित्ररथामध्ये क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले, ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे अर्धाकृती पुतळे तसेच महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. यासोबतच समतेचे महामेरू छत्रपती शाहू महाराज आणि घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेही पुतळे चित्ररथात साकारण्यात आले आहेत. विशेष म्हणजे महात्मा फुले लिखित पुस्तक व पेन या ज्ञानाच्या प्रतीकांची प्रभावी मांडणी करून समाजप्रबोधनाचा संदेश दिला जात आहे.तसेच यामध्ये भिडेवाड्याची प्रतिकृती देखील साकारण्यात आली आहे.

हा चित्ररथ समता, बंधुता, न्याय आणि ज्ञान या मूल्यांचा प्रसार करत महाराष्ट्रातील गावोगावी व शहरा-शहरांमध्ये पोहोचत आहे. प्रत्येक ठिकाणी शहरातील महामानवांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येत असून सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला जात आहे. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने आयोजित या उपक्रमाला सर्व शिव-शाहू-फुले-आंबेडकर प्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शहरात आगमन होताच या चित्ररथाचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात येत असून सामाजिक सलोखा व जागृतीचा उत्सव साजरा होत आहे.

महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त राबविण्यात येणारा हा चित्ररथ उपक्रम समाजात समतेची जाणीव दृढ नवचैतन्य निर्माण करणारा ठरत आहे. या चित्ररथा चे हिंगोली शहरांमध्ये अग्रसेन चौकामध्ये आगमन होताच फटाक्याची आतिषबादी पुष्प उधळून स्वागत करण्यात आले या रथाची अग्रसेन चौक ते इंदिरा गांधी चौक जुनी नगरपरिषद मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गाने मिरवणूक काढण्यात आली यावेळी समता परिषद जिल्हा अध्यक्ष चंदू लव्हाळे, समता परिषद महिला जिल्हाध्यक्ष वनिताताई गुंजकर, वसंत वाघ, विठ्ठल रावजी पारस्कर, केशवराज जांबुतकर, बालाजीराव सोनवणे, लिंबाजीराव थोरे, आत्माराम सातव, कैलास सातव, सुरेश ढोरे, भागवत बोधने, कैलास भोंडवे, शामराव, प्राचार्य गोरे, ज्ञानोबा गव्हाणे, गणेश बांगर, वामनराव पवार, लक्ष्मणराव ढोले, संजय सातव, राऊत, पोपळघट, जयश्रीताई सातव, ज्योती दिघडे, ज्योती धुळे, मीराताई पोपळघट, अनिकेत लव्हाळे निवेश गोरे, गजानन बमरुले, ऋषिकेश लव्हाळे, अंकुश कुटे, धामणे, स्वराज वाघ, गोलू, साहिल चौधरी इत्यादी शेकडो समाज बांधव उपस्थित होते.